
सिॲटल महाराष्ट्र मंडळ
Seattle Maharashtra Mandal
सारथी
दिवाळी अंक २०२२


OHIT'S UMBAI ASALA
MOHIT'S MUMBAI MASALA, SEATTLE USA PROUDLY PRESENTS
IMMORTAL BOLLYWOOD
The Legend Square
A Tribute to Lata Didi, Kishore Da, Asha Tai and Rafi Saab
Lake Washington High School, Kirkland
Sat, Nov 19th @ 7 PM
MADHURA DATAR
HRISHIKESH RANADE
SHAILAJA SUBRAMANIAN
Playback Singers and Live Performers
Mohit Chitnis
Concept and Direction
Satyajit Prabhu
Music arranger and keyboards,
for reality shows and live shows,
with famous 5 piece band from Mumbai
Ritesh Ohol
(Electric Lead Guitar)
Amar Oak
(Flute)
Nilesh Parab
(Tabla and Dholak)
Bhisaji Tawde
(Octopad and Drums)
Prasanna Ganapule
(Male Singer)
Sunil Deodhar
(Anchor)
Amit Soman
(Percussionist)

# सारथी

**सारथी निर्मिती पाठबळ:** सविता मोरे
**संपादन, टंकलेखन:** अश्विनी क्षीरसागर
**अंकरचना व मुखपृष्ठ संकल्पना:**
अश्विनी क्षीरसागर, विनय पवार
**मुद्रित शोधन साहाय्य:** अंबर रसाळ
**मुखपृष्ठ सजावट:** श्री. सातपुते
**छपाई व्यवस्थापन:**
अश्विनी क्षीरसागर, विनय पवार
**जाहिरात व्यवस्थापन:** वेणूका बोंडे
**जाहिरात साहाय्य:** सविता मोरे, अक्षता डोईफोडे
**प्रकाशक:** सिॲटल् महाराष्ट्र मंडळ
**मुद्रक:** Shree Sai Enterprises, Pune



ह्या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील विचार आणि मते ही सर्वस्वी लेखक-लेखिकांची आहेत. त्या मतांशी संपादक सहमत आहे असे नाही. कृपया अधिकृत परवानगीशिवाय या अंकातील साहित्य पुनःमुद्रित करू नये ही नम्रविनंती. जागे अभावी काही साहित्याचा या अंकात समावेश करत आला नाही, त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत. या अंकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या काही साहित्यात जरुरीनुसार बदल करण्यात आलेले आहेत. हा अंक आपल्या पुढे ठेवताना त्यात त्रुटी राहू नयेत यासाठी आम्ही विशेष काळजी घेतलेली आहे, तरीही आमच्या नजरचुकीने काही त्रुटी, मुद्रितदोष राहिले असल्यास आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. धन्यवाद!
आपले नम्र,
संपादक मंडळ
Copyright © Seattle Maharashtra Mandal

**इथे कला, संस्कृतीचा सुरेख मेळ**
**माय मराठीचा पसरे दरवळ**
**देई आनंद मनास निर्मळ**
**आपले सिॲटल् महाराष्ट्र मंडळ.**

**मराठी संस्कृतीचे असे राऊळ**
**मराठी माणसाचे भक्कम पाठबळ**
**भारताबाहेर हे स्नेहाचे स्थळ**
**आपले सिॲटल् महाराष्ट्र मंडळ.**

**कार्यकर्त्यांची सदैव धावपळ**
**विविध कार्यक्रमाची इथे चंगळ**
**मराठी अस्तित्वाची अखंड चळवळ**
**आपले सिॲटल् महाराष्ट्र मंडळ.**

**- अश्विनी क्षीरसागर**



# अनुक्रमणिका

संपादकीय - अश्विनी क्षीरसागर ........................................ 3
अध्यक्षीय - सविता मोरे ....................................................... 4
SMM कार्यकारी समिती, युवा कार्यकारी समिती आणि विश्वस्त समितीची ओळख ............................................... 6
Message from the Yuva Mandal ........................ 8

## कथा / लेख

SMM युवा पथकाची पहिली गर्जना - विनय पवार ...... 9
कहाण्यांची कथा - अश्विनी देवधर ................................ 10
आठवणीतली दिवाळी - श्वेता पटवर्धन चिंचवडकर ....14
निसर्गाशी जडले नाते! - शीतल पटवर्धन-बापट ..........15
आठवणींचा पारिजातक - श्रुती पाटणकर ................. 17
भले बुरे जे घडून गेले - आरती कुंटे-लोटलीकर ......... 19
प्रेम पर्बत – सौ. श्रद्धा कुलकर्णी ........................................ 21
तल्लीन गोविंदे - मोनाली गिरीश आदक .................... 23
मराठी आम्ही असे बोलतो मराठी - प्रा. सुहास पटवर्धन ............................................................................ 24
माझी डायरी - श्रद्धा राजेश ........................................... 25
उत्तर - अरुण निसरगंड ............................................... 28
गोट्या नाना - चेतन थोरात ............................................ 29
टायटॅनिक - विनायक अग्निहोत्री .................................. 31
आरश्यात डोकावताना - संगिता प्रवीण पतंगे .............33
परदेश-गमन - सुधीर सदानंद अवसरे ....................... 37
अधांतरी - एक सत्य - विनय पवार ............................ 39
Untitled Allegory - Shrihan Patil ........................ 43
Captured – Siddhant Dharap ............................. 44
Personality Preferences – Thinking and Feeling – Vinay Kshirsagar .................................. 54
Montessori Philosophy, My View – Savita More ........................................................................ 57
"अजूनही संस्कृती टिकून आहे" - श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन ....................................................... 64
BMM २०२२ - सिॲटल् करांची गौरवगाथा – अश्विनी क्षीरसागर .......................................................... 66

## कविता

श्रावणातील आवडता सण - दीपाली कुलकर्णी-जोध 12
दिवाळी सण नात्यांचा - प्रीती महाजन........................ 12
मोक्ष - पल्लवी जाधव ................................................... 14
कर्दे पुळणीवर - विनायक अग्निहोत्री ........................ 14
पुन्हा नव्याने - अश्विनी क्षीरसागर ................................ 20
निःशब्द, शब्दसूर - शीतल पटवर्धन-बापट .............. 22
सौभाग्यवती - पल्लवी जाधव ........................................ 53
कुलकर्ण्यांच्या घरचे चहामृत - दीपाली कुलकर्णी-जोध ................................................................................ 53
कोशिश करने वालों की हार नहीं होती – अनुवाद, .... 55
कृष्णरंग - कादंबिनी धारप ........................................... 58

## बालविभाग

चांदोबा, गुलाबकळी, गणपती आरोळी – अश्विनी क्षीरसागर ....................................................... 41
माझी लेझीम - ओवी केळकर ...................................... 42
भांडण - विनायक अग्निहोत्री ........................................ 42
At the fair – Sourish Panda ................................ 42

## कलादालन

माझे चित्रकार आजोबा - ईशा पोतनीस .................. 47
Plein Air Painting: A movement – Vinita Mohite ............................................................................. 48
कलाकृती - आरती पुणदीकर, ईशा मोरे, दिशा पुराडकर श्रुती मोरे, ईशा पोतनीस, अन्वी चिंचवडकर पल्लवी जाधव, तनिशा क्षीरसागर, वेणूका बोंडे ................ 50

## रुचकर (पाककला विभाग)

उकडपेंडी, मेथीचे थालीपीठ, तांदुळाच्या उकडीचे थालीपीठ - सौ. अर्चना अ. कुलकर्णी ....................... 59
पोताप्पालू, खरवस - Ruchita Wattamwar.......... 60
पुरणाचे दिंड, टिकमिकले - सौ. अमृता दिलीप कुलकर्णी ........................................................................ 61
Kakadichi Tavsoli, Surnali - रमा हेरवाडकर ... 62
जवस चटणी, जवस बडीशेप - सौ. अमृता दिलीप कुलकर्णी ........................................................................ 63
अळिवाचे लाडू - सौ. मीनाक्षी बिडकर.................. 63

## हास्य कट्टा

विनोद संकलन - अमित डोईफोडे, विनय पवार

शब्द संकलन - अश्विनी क्षीरसागर

# संपादकीय



प्रिय वाचकहो,
सप्रेम नमस्कार.

**प्रकाशदिव्यांनी झगमगावी दिवाळी**
**आनंद उधळत यावी दिवाळी**

**सुख, शांती सदैव नांदावी घरोघरी**
**समृद्धीच्या पावलांनी खेळावी दिवाळी**

अंधाराचा नाश करून प्रकाशाकडे नेणारा मंगलमय सण म्हणजे दिवाळी. आजच्या धकाधकीच्या, धावपळीच्या, महागाईच्या दिवसात आपल्या जीवनात उत्साह, आणि आनंदाचे रंग भरणारा, आपल्या नात्यांना नवीन झळाळी देणारा सण म्हणजे दिवाळी. मराठी माणूस आणि दिवाळी अंक हे नातं खूप जुनं आहे. मन प्रसन्न करणाऱ्या रांगोळ्या, आसमंत उजळून टाकणारे आकाशकंदील, बालगोपाळांनी बनवलेले किल्ले, दिवाळीचा खुसखुशीत फराळ, अभ्यंगस्नानासाठी सुगंधी उटणे-मोती साबण या बरोबरच वैविध्यतेने नटलेले दिवाळी अंक ही मराठी माणसाच्या दिवाळीची परंपराच आहे. इतर कोणत्याही सणांना न मिळालेली ही वाचन संस्कृतीची जोड मनाला एक वेगळाच आनंद देऊन जाते. या परंपरेत आपलाही खारीचा वाट असावा या हेतूने सिॲटल् महाराष्ट्र मंडळ सारथीच्या रूपाने आपले योगदान देत आले आहे. आणि म्हणूनच २०२२ चा सारथी दिवाळी अंक संपादक या नात्याने आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.

मंडळाच्या अनेक सभासदांचा या अंकात सहभाग आहे. दिवाळी अंकाच्या साहित्यासाठी दिलेल्या आवाहनास भरघोस प्रतिसाद मिळाला. त्याबद्दल तुमचे खूप खूप आभार!! लेख, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण, अनुभवकथन, गीतांचे रसग्रहण, कविता, बालसाहित्य, कलादालन, पाककृती यासारख्या विषयांचं वैविध्य असलेला हा अंक आपणा सर्वांना आवडेल अशी मी आशा करते. मायबोली मराठी बरोबरच इंग्लिश भाषेतील सभासदांचे लिखाण अंकात समाविष्ट केले आहे. सध्याच्या काळात इंग्लिश भाषेचा वापर शिक्षण आणि कामधंद्याच्या अनुषंगाने अपरिहार्य आहे पण तरीही भारताबाहेर असूनही मराठी भाषा आणि संस्कृती टिकवण्यासाठी आपण जी धडपड करत आहोत ती पाहून आनंद होतो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी असेच नेहमी आपण प्रयत्नशील राहू या आणि आपल्या भाषेचा वारसा आपण आपल्या पुढच्या पिढीकडे सोपवू या.

अंक निर्मितीसाठी अध्यक्ष सविता मोरे, अंक सजावटीसाठी श्री. विनय पवार, मुद्रित शोधनासाठी (proof reading) श्री. अंबर रसाळ, मुखपृष्ठासाठी मुद्रक श्री. सातपुते आणि जाहिरातींसाठी वेणूका बोंडे ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ह्यांचे आणि ज्या सर्वांचा ह्या दिवाळी अंकाच्या निर्मितीत हातभार लागला त्या सर्वांचे मनापासून आभार! तसंच, दिवाळी अंकासाठी आवर्जून लेखन करणाऱ्यांचेही मी SMM च्या वतीने आभार मानते. ही दिवाळी आणि येणारे नूतन वर्ष सारथीचे वाचक, लेखक, जाहिरातदार, मुद्रक, सिॲटल् महाराष्ट्र मंडळाचे कार्यकर्ते, विश्वस्त, स्वयंसेवक, हितचिंतक ह्या सर्वांना आणि त्यांच्या मित्रपरिवारास, कुटुंबास आरोग्यपूर्ण, सुखसमाधानाचे आणि भरभराटीचे जावो ही हार्दिक शुभेच्छा!

दिवाळी हा सण आपण समानता, आपुलकी, जिव्हाळा, क्षमा, माणुसकी अशा विविध गुणात्मक दिव्यांच्या तेजाने साजरा केला तर! आपलं आणि आपल्या अवतीभवती असलेल्या सर्वांच आयुष्य सुंदर आणि अर्थपूर्ण होईल.

- अश्विनी क्षीरसागर

# अध्यक्षीय

## आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः



**|| Let noble thoughts come to me in all directions ||**

नमस्कार मंडळी, मी सविता मोरे.
कोणत्याही कामास पूर्णत्वास नेण्याची माझी वृत्ती आहे, आणि माझ्या नेतृत्व गुणांचा वापर करून  मी SMM च्या ध्येय आणि उद्दिष्ट पूर्तीसाठी जोमाने काम केले.  माझ्या सोबत मी सिॲटल् मधील इतर मराठी भाषिकांना SMM बरोबर जोडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

खरं तर महाराष्ट्र मंडळ आणि माझी पहिली ओळख झाली ती दिल्लीत. मी आणि माझे कुटुंब फिरायला दिल्लीत गेलो होतो, आणि त्यावेळी आम्ही तिथल्या महाराष्ट्र मंडळाच्या इमारतीत वास्तव्यास होतो. महाराष्ट्राच्या बाहेर महाराष्ट्राची ओळख जपणारी ती पहिली वास्तू मी पाहिली. तिथले आदरातिथ्य बघून मी भारावून गेले होते. पुढे भारत सोडून अमेरिकेला आल्यावर मराठी मातीची आणि मराठी भाषेची नाळ कशी टिकवून ठेवता येईल असा विचार कायम माझ्या मनात येत असे.

२००८ साली सिॲटल्वासी झाल्यावर मात्र मी सातत्याने इथल्या मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत होते. मंडळांच्या कार्यक्रमात, केटरिंग सर्विसेस, चाईल्ड केयर, डेकोरेशनसाठी मोठ्या रांगोळ्या काढणे, लेझीम पथकाचा भाग होणे, अश्या आणि अनेक छोट्या-मोठ्या माध्यमातून मी मंडळाशी आणि त्यांच्या उपक्रमाशी जोडलेली असायचे. हे सर्व करतांना, मनात एक कायम विचार असायचा की पुढच्या पिढीला मराठी भाषेची, मराठी सणांची गोडी कशी लावायची? मंडळांचे काम अखंड पुढे चालू ठेवण्यासाठी पुढची पिढी सक्षम असायला हवी. त्यासाठी मला काम करायचे होते.

**माझा मंडळाच्या समितीवरचा प्रवास -**
२०२० मध्ये मी मंडळाच्या समितीवर निवडून आले आणि मी सर्वप्रथम मुलांचे कार्यक्रम आयोजित करण्यावर भर दिला. त्याच बरोबर २०२१ साली उपाध्यक्ष झाल्यावर, महिलांना एकत्र आणण्यासाठी पारंपरिक पध्दतीने मंगळागौरीचा कार्यक्रम केला.

सिॲटल् महाराष्ट्र मंडळ – अध्यक्ष (२०२२)

- मंडळाची अध्यक्ष झाल्यावर, मी सर्व प्रथम मंडळाची स्वतःची मराठी शाळा सुरु करण्यासाठी पुढाकार घेतला. अमेरिकेतील मराठी मुलांना मराठी भाषेची गोडी लागावी म्हणून, हसत- खेळत मराठी शिकण्यावर माझा भर आहे.
- तरुण वर्गाच्या खांद्यावर मराठीची आणि मराठी संस्कृतीची धुरा पुढे नेण्याची जबाबदारी असते, आणि म्हणूनच तरुणांसाठी रेशीमगाठी उपक्रम सुरु करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे.
- "युवा" ह्या कार्यक्रमाला पुन्हा सुरुवात केली. Persistent कंपनी चे डॉ. आनंद देशपांडे ह्यांच्या कल्पनेनुसार SMM च्या युवा सदस्यांसाठी internship program सुरु करण्यात मी हातभार लावला..

- आजी-आजोबांसाठी उत्तररंग सारखे कार्यक्रम आयोजित करून जुन्या आणि नवीन पिढीला एका मंचावर एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. Northwest उत्तररंग हा उपक्रम सुरु करण्यात माझा हातभार लागलेला आहे.
- "सारथी" ह्या सिॲटल् मधील सिॲटल्करांनी सुरु केलेल्या मासिकाचे काम पुन्हा सुरु केले.

मंडळा व्यतिरिक्त मी सिॲटल् मधील Northbrook Montessori school ची संस्थापक आहे. १० वर्षाहून अधिक शैक्षणिक अनुभवातून मी ही शाळा सुरु केली. मुलांसोबत काम करायला मला खूप आवडते. त्यांच्यात मी रमते. मुलांना घडवणे ही एक मोठी जबाबदारी आहे आणि त्याची पुरेपूर जाणीव बाळगून, त्यांना एक उत्तम नागरिक बनवण्याचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करते. माझे कुटुंब आणि मित्र परिवार ह्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले आणि माझ्या पाठीशी उभे राहिले

  - Founding member (Face Mask Army- Stitching & Cutting) school.
  - I am a devotee and volunteer at ISKCON and Hindu temple.
  - गेली ३ वर्षं मी एस एम एम च्या समितीवर काम करत असल्याने, माझ्या कामात सातत्य आहे. मराठी भाषा आज जगभर पोहोचली आहे. Sएम एम च्या माध्यमातून विविध कार्यक्रम, तसेच उपक्रम आयोजित करून, केवळ उत्तर अमेरिकेतीलच नव्हे तर जगभरातील मराठी बांधवांना व मित्र मैत्रिणींना एकत्र आणण्याचे काम मला करायचे आहे.
- I have had the privilege of serving on the Seattle Maharashtra Mandal since 2008 and then as the office bearer since 2020. Seattle Maharashtra Mandal is a big Mandal with 800+ members. All this meant a solid learning curve as an opportunity to contribute with new ideas and ideologies on the back of my professional leadership and experience. I have had the opportunity to lead and be a part of the core team that implemented many social, cultural, educational and entertainment programs – from conceptualization to execution in the last 3 years. Managing the events, keeping members together with SMM and steering Seattle Maharashtra Mandal's commitment through the pandemic has certainly been a fulfilling experience. Seattle Maharashtra Mandal is like my Warli Painting! Community members have unique skills, talent which they can display using SMM platform and ultimately, they come together, sing, dance, mingle with Joy, Peace like the center of my painting!

- **सविता मोरे**



# सिॲटल् महाराष्ट्र मंडळ
## कार्यकारी समिती २०२२

भाषा, कला, संस्कृतीचा दरवळ; मराठी अस्तित्वाची अखंड चळवळ; मराठी माणसाचे भक्कम पाठबळ;
आपले सिॲटल् महाराष्ट्र मंडळ!!!


सविता मोरे
अध्यक्ष


वेणूका बोंडे
उपाध्यक्ष


मानसी उपासनी
सचिव


प्रसाद व्यवहारे
कोषाध्यक्ष


संजय सावले
सभासदत्व


वीणा भोईटे
सभासदत्व,
युवा सल्लागार


आरती पुणदीकर
कार्यक्रम समिती


ईशा पोतनीस
कार्यक्रम समिती,
इमारत सुविधा


अंबर रसाळ
इमारत सुविधा


अश्विनी क्षीरसागर
Web Master
प्रसारमाध्यम संपर्क


अमित डोईफोडे
Web Master
प्रसारमाध्यम संपर्क


खुशबू पोतदार
सजावट
Active until May 22


पूनम गजबे
सजावट


विनय पवार
ध्वनी व्यवस्थापन


सुदत्त पाध्ये
ध्वनी व्यवस्थापन
Active until April 22


अमोल लोखंडे
भोजन/अल्पोपाहार


शमा रांगणेकर
भोजन/अल्पोपाहार

# SMM विश्वस्त समिती – २०२२

**(Board of Trustees 2022)**







कैवल्य हंसवाडकर | विकास पटवर्धन | मेघना परांजपे

# SMM **युवा मंडळ समिती २०२२**



अथर्व लोखंडे
अध्यक्ष



अमेय साठे
उपाध्यक्ष




सिद्धार्थ लोटलीकर
सचिव



तनिशा क्षीरसागर
कोषाध्यक्ष



आर्या भोईटे
Webmaster

# युवा मंडळ सभासद

अभिलाषा पाटील
केया यार्दी
तन्वी वरणगांवकर
स्वयम फराटे

आनंदी पाटील
गार्गी पेंढारकर
दुर्वा मोरे
सिद्धार्थ सावले

ईशा भागवत
गार्गी मोघे
नेहा लोटलीकर
श्रीहान पाटील

काश्यपी देशपांडे
गौरांग पेंढारकर
प्रसन्न पाटील
त्रिशा राजे

केदार लोटलीकर
चिन्मयी देशपांडे
सानवी कदम

**युवा सल्लागार** - वीणा भोईटे

# A Message from Yuva Mandal

The year began with a Yuva meet and greet! Yuva had loads of fun and got an opportunity to get to know each other as well!

Our first event was with Dr. Anand Deshpande, Founder, and Chairman of Persistent Systems and deAsra Foundation (a Non-Profit Organization). Yuva listened intently and was inspired by Dr. Deshpande's work. Soon after, the Yuva team received an internship opportunity from deAsra Foundation. We are thankful to Dr. Anand Deshpande for this opportunity and Dr. Anand Godse for guiding our Yuva through the internship!



Summer 2022 was a blast so far for the SMM Yuva team!  At the very beginning of summer, Yuva helped to conduct SMM's kids camp filled with games and cultural activities which youth enjoyed! In the month of July, our Yuva did a phenomenal job at the annual picnic event! They raised **$154** for charity by selling lemonade and cotton candy. The team also created greeting cards with heartfelt messages for nursing home residents on the eastside Seattle. Yuva enjoyed leading the Mehndi station and was also coordinating exciting outdoor games for picnic attendees.




Next was our Manglagaur event on August 21st! Yuva coordinated a food drive for this event, it was a huge success. This was then donated to underprivileged women's shelters in Seattle through Sophia Way non-profit organization.

Ganapati Bappa Morya! Ganesh Utsav was a blast! Our celebration took place on September 4th and featured a first-ever Yuva Dhol-Tasha Pathak for SMM. Yuva helped in decoration, food serving and conducted fundraiser.

Yuva team overall had a successful journey this year getting involved in the Marathi-American community, especially youth, and taking the culture forward. Some plans include outdoor meet-up and helping SMM at the Diwali celebration, Redmond lights during Christmas. We look forward to an eventful rest of the year!

Best Regards,
SMM Yuva Advisor and Yuva Committee 2022-2023

# SMM युवा ढोल-ताशा पथकाची पहिली गर्जना



**धीन... धीन... ता... धीन... धीन... ता...**

सिॲटल् महाराष्ट्र मंडळाच्या प्रथमच तयार होत असलेल्या युवा पथकाचा सर्वात पहिला सरावाचा दिवस आणि सहभागी मुले-मुली शिकत होती ढोलचा पहिला हात. मनात कुतूहल, थोडासा गोंधळ पण काहीतरी नवीन शिकायचं आहे ह्या उत्साहाने आलेली किशोरवयीन मुले-मुली काही दिवसांतच ढोलच्या पानावर हातातील टिपरूनं ठोका आणि दुसऱ्या हाताने थापी वाजवत ढोलचे अनेक हात सहज आणि दणक्यात वाजवू लागली.

सिॲटल् महाराष्ट्र मंडळ भारतातील, प्रामुख्याने महाराष्ट्रातील धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जोपासण्यात आणि अमेरिकेतील भारतीय कुटुंबांना त्याचा आनंद मिळून देण्यास नेहमीच अग्रसेर असते. आपल्या महाराष्ट्र मंडळाच्या उपाध्यक्षा वेणूका बोंडे आणि मी, मंडळाच्या ऑडिओ टीमचा विनय पवार आम्ही महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमानिमित्त युवा ढोल पथकाची कल्पना मांडली आणि ती मंडळाच्या सचिव मानसी उपासनी ह्यांनी पुढे नेली. आधुनिक काळात भारताबाहेर, इथे अमेरिकेत महाराष्ट्राची संस्कृती कायम राहावी, महाराष्ट्राच्या लोककलेचं दर्शन इथल्या लोकांना आणि विशेषकरून आपल्या भावी पिढीला व्हावं, हाच ह्या पथक निर्मितीमागचा हेतू आहे.



पथकासाठी लागणारी आवश्यक वाद्ये भारतातून मागवण्यात आली. कोषाध्यक्ष प्रसाद व्यवहारे ह्यांनी भारतातून ढोल आणि इतर वाद्ये खरेदी करून ते इथे मागवण्याची आणि त्यासाठी आलेल्या अडचणी सोडवत मुलांना शिकण्यासाठी ढोल उपलब्ध करून देण्याची कामगिरी पार पाडली. पथकाच्या प्रशिक्षणाची जबाबदारी वेणूका बोंडे आणि मी, आम्ही मिळून उचलली. प्रशिक्षण देताना SMM च्या गणेशोत्सवाच्या मिरवणुकीसाठी सर्वार्थाने वादनास सज्ज अशा युवा ढोल-ताशा पथकाच्या निर्मितीचे उद्दिष्ट आम्ही समोर ठेवले. सुरवातीला शिपिंग प्रोसेस ला विलंब होत असल्यामुळे आमचा जरा विरस झाला. ह्या अडचणीत Beats of Redmond चे श्री. आनंद साने ह्यांची मदत घेतली. त्यांनी आणि प्रसाद व्यवहारे ह्यांनी देखील आपली वाद्ये पथकाच्या सरावासाठी उपलब्ध करून दिली.



पथकाचा रीतसर सराव रेडमंड मधील Marymoor पार्क मध्ये सुरु झाला. ह्या मध्ये आम्ही मुलांना ढोलची बांधणी करण्यापासून, ढोल कमरेला बांधायला, व ढोल ताश्याचे विविध ताल, नाद व वादन प्रकार शिकवले. ढोल वाजवण्यापेक्षा तो कमरेला व्यवस्थित बांधणे व सांभाळणे हे एक मोठे काम असते. सराव सत्रात ढोल वाजवण्या बरोबरच तो बांधायचे तंत्र ही मुलांनी आत्मसात केले. ताशा शिकणारी मुले ही कडकडीत ताशा वाजवू लागली. आम्हा प्रशिक्षकांचे अथक परिश्रम, श्री. आनंद साने आणि सौ. दीपाली साने यांची आणि अनेक स्वयंसेवकांची मदत, मुलांचा शिकण्याचा उत्साह आणि पालकांची साथ ह्यामुळे उभे राहिलेले SMM चे पहिले-वहिले युवा ढोल पथक गणपतीच्या मिरवणुकीत आपल्या पहिल्या दणदणीत वादनरूपी गर्जनेसाठी सज्ज झाले. ४ सप्टेंबर २०२२ ला निघालेल्या गणेश मिरवणुकीत असंख्य उपस्थितांनी त्यांच्या वादनास भरभरून दाद दिली.



तर असं बनलं आपलं SMMचं पहिलं मुलांचं ढोल-ताशा पथक!!! आपल्या युवा ढोल पथकाच्या निमित्ताने आपल्या पुढल्या पिढीला आपल्या संस्कृतीची एक जाण करुन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला SMM मध्ये नेहमीच मानाचे स्थान असणार.

**गणपती बाप्पा मोरया!!!** **विनय पवार; SMM EC-२०२२ सह**

# कहाण्यांची कथा



आषाढाचे काही दिवस उलटले की श्रावण महिन्याचे वेध लागतात. तृषार्त धरित्रीची तगमग शमल्यानंतर हिरवीगार तृप्तता सगळीकडे भरून राहिलेली असते आणि मग ऊनपावसाचा खेळ सुरु होतो. क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे असा इंद्रधनुष्याचे स्वप्न दाखवणारा श्रावण येतो.
व्रतवैकल्यांचा, सणांचा, माहेरवाशिणींचा, फुलापानांचा आणि रंगांचा श्रावण!! रिमझिम पावसाचा, ओल्या कोवळ्या हिरवळीचा, कोवळ्या मुग्ध भावभावनांचा, सुखाच्या सरींचा, उबदार उन्हाचा... आणि कहाण्यांचा!!

श्रावण महिन्याच्या कहाण्या हा लहानपणीचा कुतूहलाचा प्रकार होता. अजूनही ते कुतूहल तसंच आहे. श्रावण सोडला तर कुठल्याच महिन्याच्या अश्या दर वाराच्या कहाण्या नाहीत. मातीत रुजून रोपटं सरसर वर यावं तशाच ह्या कहाण्या श्रावणांत रुजून कानोकानी झाल्या आहेत. काही दिवसांच्या तर दोन तीन आहेत. शिवाय नागपंचमी, शिळासप्तमी, मंगळागौर, जिवती अश्या विशिष्ट कहाण्या आहेत.

आईची आई नेहेमी खुलभर दुधाची कहाणी सांगायची. ती ऐकायला खूप आवडायचं. म्हातारीच्या एवढ्याश्या दुधाने गाभारा भरून गेला हे लहानपणी गंमतीदार वाटलं तरी आता त्यातला व्यवहारीपणा आणि भाविकपणा दोन्ही लक्षात येतो. म्हणजे रोजचं जीवन जगताना किंवा स्वतःच्या श्रद्धा जपताना सुद्धा आपला विवेक सुटता कामा नये हे भान ठेवायलाच हवं. अश्या किती कहाण्या आहेत. सणांच्या, व्रतवैकल्यांच्या, आवडती, नावडतीच्या, नागकन्या, देवकन्या, शंकर पार्वती, ब्राह्मण, राजे राण्या, सवाष्णी, कुवारणींच्या. काही कहाण्या थोड्या विचित्र, वेगळे कधी कानावर न पडलेले शब्द वापरणाऱ्या. कधी अतार्किक, असंभवनीय आणि कधी भाबड्या आणि असंबद्धही वाटणाऱ्या!! दैन्य, कष्ट दूर करणाऱ्या, श्रद्धेचं फळ देणाऱ्या आणि श्रद्धेत बळ आहे असं सांगणाऱ्या, समस्यांचे उपाय सांगणाऱ्या किंवा काहीच नाही तर 'फील गुड' चा फील देणाऱ्या. उतू नको मातू नको घेतला वसा टाकू नको म्हणणाऱ्या, शापाच्या, शिक्षेच्या, दारिद्र्याच्या आणि महाल, रत्न, मोत्ये माणकं, धनधान्य, दूधदुभतं, ऐश्वर्य ह्याच्याही. एखादं व्रत कधी धरायचं, त्यात काय करायचं, ते कसं सोडायचं त्यामुळे काय होतं ह्याची उत्कंठावर्धक मांडणी करणाऱ्या. म्हणजे जशी आपल्या स्तोत्रांमध्ये फलश्रुती असते तशी या कहाण्यांमध्येही आहे व्रतांची फलश्रुती.

साध्या सोप्या इवल्याश्या वाक्यांमधून मोठा अर्थ उलगडणाऱ्या ह्या गोष्टींची सुरुवात एक तर आटपाट नगर होतं अशी होते किंवा ऐका नागोबा किंवा ऐका ऋषिश्वरा तुमची कहाणी अशी होते. छोटी लयदार वाक्य असल्यामुळे त्याला आपसूक एक नाद आहे आणि ती लक्षात राहायला अगदी सुलभ आहेत.
वास्तविक पाहता हा लोकवाङ्मयाचाच प्रकार!! जशी लोकगीतं, जात्यावरच्या ओव्या, तशाच ह्या कहाण्या. पण धार्मिक भावनेवर आधारलेल्या लोककथा म्हणजे कहाण्या!! प्रश्न उत्तरांच्या रूपात सांगितलेल्या आणि चातुर्मासात करायची व्रतं, त्यांचे नियम ह्याचा खुलासा असलेल्या. देवदेवतांचं माहात्म्य सांगणाऱ्या. श्रावणातल्या म्हणून प्रसिद्ध असल्या तरी

चातुर्मासाचे चारही महिने म्हणजे श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक ह्या महिन्यात येणाऱ्या सणांच्या सुद्धा कहाण्या त्यात अंतर्भूत आहेत. म्हणून मग हरितालिका, ऋषिपंचमी, वसुबारस ह्याही कहाण्या सांगितल्या आहेत.

पूर्वीच्या काळी कहाण्या सांगणाऱ्या बायका घरोघरी जाऊन त्या सांगत. मौखिक असल्यामुळे कदाचित त्यात थोडा तिखट मीठ मसाला ज्या त्या बाईच्या किंवा ज्या घरी सांगितल्या जात आहेत त्या घराच्या अनुसार भरीला घातला जात असेल. पिढ्यानपिढ्या हा कहाण्यांचा प्रवास चालू राहिला असेल.

आता विचार केला तर असं वाटतं तो सुद्द्धा एक विरंगुळाच होता की!! घरातल्या बायकांना स्वप्नराज्यात थोडावेळ विहरायला मिळायची एक संधी. त्यांच्यासाठी एक अद्भुत विश्वाची सफर. बायकांसाठीच्या परीकथा म्हणू हवं तर. ज्याच्यात प्राणी पक्षी बोलतात, मदत करतात, वर देतात, शाप देतात, दु:खातून सुटका होण्याचे उपाय सांगतात, देव प्रसन्न होऊन कृपा करतात, वेषांतर करून समोर येतात, झाडांना रत्नमाणकं लागतात आणि तळी दुधाने भरतात. झोपडीचे महाल होतात आणि दुधाच्या थेंबांचे मोती होतात. सगळ्यांना आपल्या चुका कळतात पण गम्मत म्हणजे ज्याला मदत हवी आहे त्यालासुद्धा फुकट मिळत नाही तर त्यासाठी नियमाने व्रत करावं लागतं, उपवास करावा लागतो, भक्तिभावाने प्रार्थना करावी लागते. जादूची कांडी फिरवली आणि कायापालट झाला असं नसून मनापासून श्रद्धेने सांगितलेलं व्रत तडीला न्यायला लागतं; कितीही अडचणी आल्या तरी. कधी स्वतः उपाशी राहून इतरांना खाऊ घालावं लागतं, कधी प्रायश्चित्त घ्यावं लागतं. क्षमा मागावी लागते. करुणा भाकावी लागते.

रूपकांच्या, कथांच्या माध्यमातून सांगितलं जाणारं काहीही मनावर जास्त ठसतं आणि परिणाम करतं. तशाच ह्या गोष्टी सर्वांसाठी विशेषतः स्त्रियांसाठी म्हणून रचल्या गेल्या असतील कदाचित. मंगळागौरीच्या कहाणीचा शेवट कृष्णाने धर्मराजाला सांगितलेली असा आहे. पण हा अपवाद सोडला तर बहुतेक वेळा साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण असाच आहे. म्हणजे संक्षिप्त रूपात एखादी अडचण का आली आणि त्याचं निराकरण कसं झालं हे स्पष्टीकरण केलं आहे. जुन्या काळातले सकारात्मकता, माइंडफुलनेस, संयमन, वर्तणूक ह्याचेच धडे होते ते. चुकीला शिक्षा होते हा धडा होता, चुकीला प्रायश्चित्त घेऊन परिमार्जन होतं आणि चुकीला क्षमा सुद्धा होते ह्याची शिकवण होती.

सामाजिक परिस्थितीच्या रेट्यामुळे किंवा परकी आक्रमणांच्या भीतीमुळे चार भिंतींमध्ये बंदिस्त झालेल्या स्त्रियांना ह्या कहाण्यांद्वारे विरंगुळा, सणवारांच्या निमित्ताने मोकळीक मिळत असणार. स्वतःसाठी थोडा वेळ कढायची संधी मिळत असणार. कामातून उसंत घेतली म्हणून कुणी लगेच टाकून बोलायला नको अशी संधी मिळत असणार.
उपवासाच्या निमित्ताने स्वतः साठी थोडे वेगळे पदार्थ करून खायची संधी. स्वतः साठी कुठे काय करत होत्या त्या कधी? सवाष्ण म्हणून जेवायला जाताना, थोडं सजून सवरून, सालंकृत होऊन जाताना आयतं जेवायला मिळायचीही ती एक संधीच होती. सवाष्णीचा मान म्हणून साग्रसंगीत सुग्रास अन्न आग्रह करून वाढलेलं.. प्रेमाने वाढणारी यजमानीण!! कुठल्याही बाईला का नाही छान वाटणार? दुसऱ्या दिवशी त्याच त्याच कामाच्या धबडग्याला सामोरं जाताना थोडा जास्त उत्साह वाटत असेलच!! आदल्या दिवशी ऐकलेली कहाणी मनात रुंजी घालत असेल आणि त्यातल्या सुनेच्या किंवा राणीच्या, आवडतीच्या किंवा नावडतीच्या, मुलीच्या किंवा आईच्या सुख दु:खाशी स्वतःची नाळ जोडल्यासारखं वाटत असेल आणि मग घागर घेऊन नदीवर जाताना किंवा रांधा वाढा करताना ह्या कहाण्यांच्या कल्पनारम्य विश्वात हरवून थोडा कष्टांचा विसर पडत असेल. हाच तर उद्देश असतो ना कहाण्यांचा?

- **सौ. अश्विनी देवधर**

## माझा श्रावणातील आवडता सण

श्रावणासंगे आला सण तो आवडता नागपंचमी,
झाले दंग बालपणीच्या रम्य आठवणीत मी.
करू पूजा वारुळाची देऊ नागोबाला लाही दूध,
धरतीवरचे नवचैतन्य पाहून माझे मन होई मुग्ध.

नैवेद्याला असे घरी कडबू किंवा दिंड,
लेकीच्या सुखासाठी माय करे प्रार्थना उदंड.
घालू आज नव्या बांगड्या रंगवू हाती मेंदी,
लेकीचे लाड पुरवून होई माय खूप आनंदी.

पंचमीच्या सणादिवशी देते लेकीसाठी वाण,
तिच्या बागडण्याने फुलते माझे आंगण.
अंगणात माझ्या झोका खालीवर झुले,
लेकीला झुलताना पाहून माय आनंदाने फुले.

लेकीचा झोका जाई उंच निळ्या आभाळात,
माय पाही कौतुकाने असे अभिमान उरात.
मन झुलते खालीवर आठवणींच्या हिंदोळ्यावर,
आठवणींनी नकळत आसवे ओघळती गालावर

सण साजरा हा अजूनही आवडे मजला,
आठवणींनी तो देई सदैव ऊर्जा मला.

**- दीपाली कुलकर्णी -जोध,**



## दिवाळी - सण नात्यांचा

दिवाळीचा सण हा मोठा, करू साजरा आनंदाने
एकत्र येऊनी गाऊनी गाणी, वेळ घालवू हर्षभराने

घरापासूनी दूर राहीलो, टिकवू या ही दिव्य संस्कृती
प्रेमशृंखला घट्ट विणूया, कोमल हृदये जपण्यासाठी

आई, बाबा, भाऊ बहिणी मैलो-न-मैल दूर असती
तुमच्यासारखे मित्रमैत्रिणी, त्यांची उणीव भासू न देती

छेडूनी तारा मम् हृदयाच्या, मनामध्ये केलेत घर
पुण्यकर्म हे गत जन्मीचे म्हणून आपला जुळला स्वर

ऋणी मी तुमची जन्मभराची साथ ही अशीच लाभू दे.
वर्षानुवर्षे तुमची आमुची, नाळ ही अशीच जुळू दे.

**- प्रीती महाजन**



# आठवणीतली दिवाळी

इथे अमेरिकेत दिवाळीत सुट्टी नसते आणि ऑफिसचं काम जास्त असेल तर स्वतःहून ही घेता येत नाही. आज बरेच वर्षांनी दिवाळी वीकएंडला म्हणजेच शनिवार रविवारी आली होती आणि मी ऑफिसला शुक्रवारी सुट्टी घेऊ शकले होते. आज मला आरामात दिवाळीची तयारी करता येणार होती, मनसोक्त सजावट करता येणार होती, रांगोळी काढता येणार होती. आईने भारतातून तब्बल २ किलो वेगवेगळ्या रंगांची रांगोळी आणली होती. मी उत्साहात घराच्या बाहेर गेले, पाहते तर लगेच लक्षात आलं इथे तर सगळीकडे कार्पेट आहे! आणि मोठी रांगोळी काढायला तर जागाच नाहीये :(

मग कार्डबोर्ड पेपरवर मी बॉर्डरची रांगोळी काढली खरी पण मला माझ्या मनात असलेल्या रांगोळीचं काही समाधान मिळालं नाही. दिवाळीतली रांगोळी म्हटलं की माझ्या डोळ्यांसमोर येते ती अंगणात काढलेली मोठी चौकोनी रांगोळी.

मी शाळेत असताना सुट्टी लागली रे लागली की आमची दिवाळीची तयारी सुरु व्हायची. आमच्या चाळीतल्या घरासमोर छोटंसं आडवं अंगण होतं. आईने त्याच्यावर खास रांगोळी काढण्यासाठी असा भिंतीला लागून दरवाज्याच्या बाजूला ओटा तयार करून घेतला होता. आम्ही पाणी शिंपडून, गेरूने सारवून, तो वाळला की त्यावर छान रांगोळी काढायचो. त्या गेरूच्या गडद लाल रंगावर रंग न भरताही रांगोळी कशी उठून दिसायची. आम्ही तिघी, मी आणि माझ्या बहिणी स्वाती आणि स्नेहा मिळून कधी रांगोळीच्या पुस्तकातून बघून किंवा कधी मनानेच नवीन डिझाईनची ३० X ३० ठिपक्यांएवढया ओटा भरून रांगोळी काढत असू. माझा तर सुबक आणि वेगवेगळ्या आकारांच्या रांगोळ्या काढण्यात हातखंडा होता. आमच्या शेजारी चार घरं होती. आमची रांगोळी काढून झाली की आम्ही एकमेकींना रंग भरायला मदत करायचो. ओळीने सगळ्यांच्या दारापुढच्या रांगोळ्यांनी अंगण सजून जायचं. कधी कधी त्याच्या जोडीला किल्लाही असायचा! दुकानातून किल्ल्यावर ठेवायला मातीचे शिवाजी राजे आणि मावळ्यांचे पुतळे आणायचो. आता ते मिळतात की नाही माहित नाही. संध्याकाळी पणत्यांच्या आणि आकाशकंदिलाच्या प्रकाशात आसमंत उजळून निघायचा.

आकाशकंदिलांमध्ये चांदणी माझ्या विशेष आवडीची. मी लहान असताना आईने माझ्या बरोबर कार्ड पेपर आणि क्रेप पेपरचा चांदणीचा आकाश कंदील बनवला होता. नंतर तर शाळेत हस्तकलेच्या वर्गात आम्ही बरेच वेगवेगळे कंदिल करायला शिकलो. एवढ्याश्या छोट्याश्या अंगणात आम्ही १०-१२ मुलं बिनधास्त लवंगी माळा, बॉम्ब आणि इतर फटाके वाजवायचो. काही पोपट फटाके आणि लवंगीतले सुटे केलेले फटाके पणतीवरच लावून सोडायचो. आता तर कित्येक वर्षांत फुलबाजी सोडून दुसरे फटाकेच वाजवले नाहीत :(

नरक चतुर्दशीला सुद्धा आम्ही सकाळी उठून पणत्या लावायचो, आवाजाचे फटाके वाजवायचो, पायाखाली चिरांट फोडायचो. मला आठवतं आम्ही सगळे पहाटे उठत असू आणि आई आम्हाला सगळ्यांना साय, हळद, उटणं लावून मालिश करायची, ते थोडा वेळ अंगात मुरुदे म्हणायची. तेव्हा थंडी वाजायची पण नंतर गरम पाण्याने अभ्यंगस्नान केल्यावर छान सुगंधी, प्रसन्न वाटायचं. आंघोळ झाली की आम्ही अंगणात फटाके वाजवायला पळायचो म्हणजे जो आंघोळ करत असेल त्याला आवाज ऐकू जाईल. त्यासाठी आम्ही आधीच एकमेकींना बजावून ठेवायचो. या सगळ्या गमती जमती आठवल्या की हसायला येतं.

दिवाळी म्हटलं की फराळ विसरून कसं चालेल? तो तर मुख्य! आई सगळा फराळ घरी करायची. तेही अतिशय मनापासून आणि निगुतीने. मग तो उत्तम नाही झाला तरच नवल. बाबांसाठी लाडू तर मला चकल्या शंकरपाळे आणि

करंज्या जास्त आवडीच्या. चिवडा तर नेहमीचाच. मी आठवी नववीत असताना आईला तळायला मदत करायचे. त्याशिवाय बाकी काही मदत केल्याचं मला फारसं आठवत नाही :) कितीही मोठे डबे भरून फराळ केला तरी अर्धा तर दिवाळीच्या आधीच करतानाच फस्त व्हायचा! आम्ही शेजारी एकमेकांना फराळ वाटायचो. भाऊबीजेला आम्ही सगळी भावंडं आमच्याकडे तर कधी मावशी, मामाकडे एकत्र जमायचो. खूप मज्जा यायची.

मला वाटतं कोणालाही आठवणीतली दिवाळी कोणती असं विचारलं तर नक्कीच सगळ्यात आधी बालपणीचीच दिवाळी आठवेल. कारण त्यावेळी होती फक्त मज्जा, मस्ती आणि धमाल! ही सगळी मजा जरी आठवणीतच राहिली असली तरी प्रत्येक दिवाळी ही आनंदाचीच असते. त्याचं रूप जरी बदलत असलं तरी एकमेकांबद्दलचं प्रेम, स्नेह, नाती हे अधिकाधिक घट्ट होत जावीत हे महत्वाचं.

मी घराच्या आत खिडकीच्या कठड्यावर रांगोळीने वेल काढायला घेतले. पाचच मिनिटांत माझ्या आठ वर्षांच्या मुलीने- अन्वीने त्याचा ताबा घेतला. थोड्याच वेळात वेलावरच नाही तर घरात सगळीकडे रंगीबेरंगी रांगोळीची सुंदर फुलं होती, आणि माझ्या मनात ही दिवाळी आधीच खास झाली होती!

- **श्वेता पटवर्धन चिंचवडकर**

---

# मोक्ष

परतीच्या शिदोरीस सैलसर उसवण
सांडून गेले माझे मीपण
रिती राहिली पुन्हा झोळी
आणि विरले हे ही जीवन

आता पुन्हा तोच ध्यास
फिरूनी पुन्हा नवे श्वास
मृगजळाच्या वाटेवरी
सापशिडीचा डाव खास

चक्रव्यूह हे रचले असे
तूच तुझे विणले जाळे
घे अंतरीचा ठाव जरासा
आत तुझी पाळेमुळे

**-पल्लवी जाधव**

# कर्दे पुळणीवर

निळ्या जळावर काळा डोंगर, सरतो पुढती बघता बघता.
क्षणात होतो फेनधवल तो, पायापाशी येतो फुटतो.

पायाखालून वाळू सरते, उभे राहणे कठीण होते.
प्रचंड भिंतीपरी फुटते जळ, आदळूनी वर, येते खाली.

नक्षी काढती कुरल्या इवल्या, ओलसर वाळूवर टिकल्या.
टिकल्या टिकल्यांची रांगोळी क्षणभर टिकते, विरते सगळी.

लाटा फुटती पुळणीवरती, जणू सांगती धरणीला.
धावत बघ सागर आला, आतुरतेने तुला भेटण्या.

**- विनायक अग्निहोत्री**



# निसर्गाशी जडले नाते!

मला असं नेहमी वाटतं, निसर्ग ही एक मानवाला मिळालेली देणगी आहे, एक वरदानच म्हणा ना!

श्रावणमासी हर्षमानसी हिरवळ दाटे चोहीकडे ।
क्षणात येथे सरसर शिरवे, क्षणात फिरुनी उन पडे।।

कालच सहज वाचताना पाठ्यपुस्तकातील एक कविता दिसली. साहित्यावर नितांत प्रेम करणाऱ्या आणि मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या बालकवींनी निसर्गाचे किती अचूक आणि सहज, सोपे वर्णन केले आहे. अचानक माझे निसर्गावरचे प्रेम जागे झाले. परमेश्वराने सृष्टी निर्माण केली आणि ह्याच सृष्टीवर, निसर्गावर अनेक कवी, कवयीत्रींनी काव्ये रचली. चित्रकारांनी चित्रे रेखाटली. इतकच नव्हे, तर संगीतातूनही निसर्गवर्णनाचे सूर घुमू लागले. खरच हा निसर्ग किती आनंददायी असतो नाही का!

सूर्य उगवताना आणि मावळताना दिसणारे त्याचे रूप, सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंतचे त्याचे निराळे रूप, किलबिलाट करणारे आणि नभात उडणारे पक्ष्यांचे थवे, वाऱ्यावर डोलणारी गवताची पाती, शेतात डोलणारी रोपे अश्या कितीतरी विलोभनीय गोष्टी निसर्गाने निर्माण केल्या. रिमझिम पडणारा पाऊस, ओला मृद्गंध, खळाळणारे झरे, मऊ मखमली हिरवळ, पाण्यावरचे ते दवबिंदु या सगळ्याचे वर्णन ऐकतच रहावे आणि सारी सृष्टी डोळ्यात साठवावी अशी एक सुप्त इच्छा कोणाला होणार नाही!

अश्या या किमयागार निसर्गावर मी मनापासून प्रेम करते. निसर्गाबद्दल आकर्षण नाही असा माणूस विरळच! निसर्ग ही एक महान आणि अदभूत शक्ती आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मिळणारा आनंद काही औरच! श्रावण महिन्यातील पहिला वहिला पाऊस! प्रत्येकालाच हवाहवासा वाटणारा, आल्हाददायक असा वाऱ्याबरोबर पसरणारा तो मृद्गंध अहाहा! एखाद्या कवीलाच काय तर लहान मुलालाही पटकन एक ओळ सुचेल. शाळेत असताना" ये रे ये रे पावसा , तूला देतो पैसा" आणि " ये ग ये ग सरी माझे मडके भरी" या गाण्यांच्या तालावर आम्ही स्वतःभोवती फिरायचो. "गारा गारा भिंगोर्या" असे म्हणत रिमझिम पाऊस अंगावर घ्यायचो. हसता हसता, गाणे म्हणताना अचानक वीज चमकून पाऊस सुरू व्हायचा. रम्य तो निसर्ग!

जणू काही हिरवी शालच पांघरलेल्या ह्या सृष्टीत एका सकाळी छोट्याश्या घरट्यातून बाहेर पडणारे पक्षी पाहिलेत कधी? कुठेतरी दाणापाणी शोधून सूर्यास्ताच्या वेळी आपल्या घरट्यात परतून पिलाला जाऊन बिलगतात ते. घेतलात कधी हा अनुभव? एव्हढ्या जवळून पाहिलेले ते दृश्य म्हणजे आनंददायी निसर्गच की! लहान असताना "पावसाच्या धारा येती झराझरा, आला सोसाट्याचा वारा, फुले मयुर पिसारा" किंवा "कोकीळ कुहु कुहु बोले पाण्यावरती कमळफुले, बदक मासे पाण्यावरती, पशु पक्षीही आनंदले किती! " अश्या थोड्याश्या त्या वयाला साजेश्या अश्या ओळी मला सुचलेल्या. त्या बाळबोध ओळीत असलेली सहजता निसर्गानेच तर दिली.

ऋतू, पशु, पक्षी या सर्वांप्रमाणेच 'फुले-फळे' निसर्गाचे लावण्य खुलविण्यात महत्वाची भूमिका बजावतात. प्राजक्ताचा, बकुळीचा मोहक सुगंधी सडा असो वा चिंचा, आवळे, पेरू, असोत, मानवाला त्याचा उपयोगच होईल अशी योजना निसर्गाने केली आहे. तो स्वतःकडे असे काहीच ठेवत नाही. वड,पिंपळ, बेल,तुळस, दुर्वा निर्माण केले त्यानीच. शेवटी ते परमेश्वराच्या चरणी वाहिले जाते. थोडक्यात काय तर निसर्गच परमेश्वर आणि तोच कर्ता करविताही! या जगात जे जे

उत्तम आहे ते उदात्त आहे. 'तानापिहिनिपाजा' अश्या सप्तरंगी इंद्रधनूच्या रंगांची उधळण करून एक उत्तम चित्र तयार होते. इंद्रधनुचे सात रंग म्हणजे जणू संगीतातील सात स्वरच. इंद्रधनुचे सप्तरंग हे नयनांना आल्हाद देती संगीतातले सप्तसूर ते मनी माझ्या झंकारती। चित्र काढुनी चित्रकार तो दिसे त्याची कल्पनाशक्ती निसर्गाशी जडवू नाते मनी असो भावभक्ती॥

बहुगुण संपन्न असा निसर्ग आपल्या सिॲटल् करांना काही नविन नाही. 'रेनियरच्या' आडून या सजीव सृष्टीशी लपंडाव खेळणारा तो रवीराज, मखमली फुलांमधून प्रकाश किरणांचा वर्षाव करत असतो. रात्री निद्रित झालेली ती 'ट्युलिपची' गोजिरवाणी फुले आईच्या कुशीतून बाहेर पडणाऱ्या लहान बाळाप्रमाणे हळुवार उमलतात. 'स्नोकॉलमी' च्या श्वेत, निर्मळ, दुधाळ अश्या झऱ्यातून उडणारे तुषार अंगावर घेत संध्याकाळ अगदी मस्त जाते. Summer मधील 'फार्मर्स मार्केट' साठी हा निसर्ग लागवडीसाठी मदतच करतो. भारतात 'सहा ऋतूंचे सहा सोहळे' असे म्हणत प्रत्येक ऋतू आपले रूप दाखवतो. पण इथे मात्र चार ऋतु स्वतःच्या गुणांची उधळण करतात. थोडक्यात काय 'fall' असो वा 'Spring' सिॲटल् च्या गर्द झाडीला तोड नाही!

आज विज्ञान कितीही पुढे गेले तरी निसर्गापुढे त्याला मान तुकवावीच लागते. मनुष्य, पशु, पक्षी सर्वच निसर्गाचा एक अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे निसर्गाची निगा राखणे आपली जवाबदारी आहे. आजचा माणूस निसर्गाची लूटमार करून, त्याला ओरबाडून स्वतःला निसर्गापासून दूर लोटत आहे. Bulidings, malls बांधताना, आधुनिकीकरणाच्या मागे धावताना वृक्षतोड मात्र थांबवायला हवी. निसर्गावर प्रेम केले तरच आपल्याला सुखासमाधानाने जगता येईल.

या जन्मावर या सृष्टीवर शतदा प्रेम करूया ।
आशिष सदा राहील त्याचा नवीन नाते जडवूया ॥

**- शीतल पटवर्धन-बापट**

## हास्यकट्टा 😆 😆😆

आई: "बंड्या आज काय शिकवले शाळेत."
बंड्या: "लिहायला शिकवले."
आई: "अरे वा छान! काय लिहिले?"
बंड्या: "काय माहीत? अजून वाचायला नाही शिकवले..."

गणू : आजी, मी पळण्याच्या शर्यतीमध्ये भाग घेतला. सगळी तयारी पूर्ण झाली फक्त तुझ्या आशीर्वादाची गरज आहे. असे म्हणून गण्या आजीच्या पाया पडतो.
आजी: सावकाश पळ रे बाबा!

**संकलन- अमित डोईफोडे**

# आठवणींचा पारिजातक

आठवणींचा पारिजातक ही कथा आहे एक 60 वर्षांची आजी आणि तिची 6 वर्षांची नात, या दोघींची. दोन मैत्रिणींची, दोन सख्यांची, एका उमलणाऱ्या फुलाची आणि मावळतीकडे झुकणाऱ्या सुर्य फुलाची. कथा एका वाक्यात सांगावयाची झाल्यास, आजी आणि नात यांची देवपुजेसाठी लागणाऱ्या फुलांसाठी होणारी प्रभातफेरी. आपल्याला प्रत्यक्ष न भेटलेल्या या आजीची नातीने आपल्या शब्दानी वाचकांशी घडवलेली भेट.

मला आठवतंय, साधारणपणे मी 6 वर्षांची होते तेव्हा. पहाटे 5.30 वाजता मी आणि आजी दोघीजणी, एकमेकींचा हात धरून म्हणण्यापेक्षा, मी आजीचा हात धरून घराबाहेर पडत असू. पहाटेच्या त्या शांत वातावरणात, आम्ही आमचे घरापासून थोडया अंतरावर असलेल्या एका बंगल्यातील पारिजातकाच्या झाडाची फुले गोळा करावयास जात असू. चालता चालता, आजी मला पुराणकाळच्या कथेमध्ये केव्हा घेवून जात असे ते माझे मलाही कळत नसे.

"हे पारिजातकाचे फुल आहे ना, ते थेट इंद्रदेवाच्या घरून, म्हणजे स्वर्गातून पृथ्वीवर आले आहे बरं का! इथे अनेक स्वर्ग आहेत. त्यापैकीच एक इंद्रदेवाचा स्वर्ग. या इंद्रदेवाच्या व्दारी हे पारिजातकाचे झाड होते. इंद्रदेव हा अस्वस्थ देव होता. आपला स्वर्ग, आपले वैभव आपल्याकडे असलेल्या पारिजातकासारख्या खास गोष्टी सांभाळणे ही त्याला मोठी काळजी वाटे. एकदा एका राक्षसाबरोबर युध्द करण्यासाठी भगवान विष्णुंकडे त्याने मदत मागितली. त्यावेळी इंद्राने आपल्या हृदयामध्ये घर केलेल्या पारिजातकाचे झाड तुला देईन, असे वचन भगवान विष्णुंना दिले. भगवान विष्णुंच्या मदतीने त्याने युध्द तर जिंकले, पण पारिजातकाचे झाड देण्याबाबतचा शब्द मात्र तो विसरला, पारिजातक देण्याची टाळाटाळ करू लागला. जेव्हा भगवान विष्णुंचा राग अनावर झाला तेव्हा इंद्राला आपल्या चुकीची जाणीव झाली व त्याने झालेल्या चुकीची माफी मागून हा स्वर्गीय वृक्ष भगवान विष्णुंना दिला. श्रीकृष्ण अवतारामध्ये भगवान विष्णुंनी आपणा सगळयांसाठी तो पृथ्वीवर आणला. तात्पर्य काय तर कोणालाही दिलेले वचन नेहमी पाळावे. या पारिजातकाच्या फुलांची आणखीन एक गंमत माहिती आहे? ही फुले तोडावी लागतच नाहीत, उमलली की ती फांद्यांवरून गळून पडतात. त्यामुळे पारिजातकाच्या झाडाखाली पहाटे पहाटे फुलांचा सडा पडलेला असतो."

पुराणकाळातील ती गोष्ट ऐकताना, इंद्रदेव, त्याने भगवान विष्णुंकडे मागितलेली मदत, इंद्रदेवाने पारिजातक देण्याची केलेली टाळाटाळ, भगवान विष्णुंचा अनावर झालेला राग, या सगळया सगळया गोष्टी माझे डोळयासमोर उभ्या राहत. गोष्ट सांगण्याची माझ्या आजीची हातोटी, खुबी, कसब होतेच तसे. आमच्या घरापासून अंदाजे अर्ध्या मैलावर एका बंगल्यामध्ये भव्य पसरलेले लौकिक अर्थाने ज्याला पारिजातक म्हणतात ते झाड होते. पुराणकाळातील या झाडाला पृथ्वीवर भगवान विष्णुंनी आणल्यामुळे त्याचे नाव होते 'हरसिंगार'. नारंगी रंगाचे नाजूक देठ. त्या देठावर उभ्या असलेल्या पांढऱ्या पाकळ्या, पहाटेच्या वेळी नाकात शिरणारा मंद सुवास, निसर्गाची ही कलाकुसर, हे फुल स्वर्गातून आले आहे याची खात्री देणारी. निसर्गाने खास वेळ काढून बनवलेले हे फुल म्हणजे परमेश्वराने मानवाला दिलेला आशिर्वाद. शब्दात हे व्यक्त करणे खरोखरच अवघड नव्हे अशक्य आहे. पण आजीची गोष्ट ऐकत ऐकत याचा अनुभव घेणे ही भाग्याची गोष्ट आहे. मला अभिमान वाटतो की ती भाग्यवान मी आहे.

पहाटे उठून आजीबरोबर फुले वेचावयास जाण्यासाठी मी इतकी उत्सुक, उतावीळ असायचे की, कोणतीही कटकट न करता मी उठत असे, हात पाय तोंड धुवून आजी सांगेल ते सगळे ऐकत असे, मुकाटयाने दूध पित असे आणि आजीबरोबर फुले वेचण्यासाठी जात असे. होय! वेचण्यासाठीच म्हटले मी! तोडण्यासाठी नाही. झाडावरची फुले तोडावयाची नाहीत, झाडावरून खाली पडलेली फुले घ्यावयाची, त्याला फुले वेचणे असे म्हणतात. आजीने सांगितल्याप्रमाणे खरोखरच पहाटे पहाटे, त्या बंगल्यात असलेल्या हिरवळीवर पारिजातकाच्या झाडाच्या नाजुक फुलांचा अक्षरशः सडा पडलेला असे. बंगल्याच्या कुंपणाबाहेरील फुले वेचण्याला आमचे प्राधान्य असे.

मी माझे परडीत जेवढी जमतील तेवढी फुले गोळा करीत असे. माझी परडी गच्च भरल्याशिवाय मी आजीकडे पहातही नसे. कुंपणाबाहेरील फुले वेचल्यानंतर आजी सदर बंगल्याचे फाटक उघडून आत मला घेवून जात असे. फाटक उघडून आत जावून फुले वेचणे म्हणजे फुले चोरणे असे मला मनातल्या मनात वाटे. पण देवाने पृथ्वीवर आणलेल्या आणि देवासाठीच झाडावरून पडलेली फुले आपण गोळा करतो, म्हणजे काही पाप नाही असे म्हणून माझे मीच समाधान करीत असे.



आम्ही घरी आल्यावर आजी त्या सर्व फुलांचे सुंदर हार तयार करीत असे आणि सर्व देवांना वाहत असे. भारतातल्या इतर आजी आजोबांप्रमाणेच माझी आजीदखील खूपच धार्मिक आणि देवभोळी होती. देवभोळी म्हणजे जगातल्या आपल्याला माहित नसलेल्या, पण असलेल्या अनाकलकनीय शक्तीवर विश्वास ठेवणारी होती. आजीने तयार केलेले हार सर्व देवांना वाहिल्यानंतर दिवसभर येणारा त्याचा सुगंध आत्ता या क्षणी माझ्या नाकात आणि मनात आहे.

मला आठवतंय, एकदा आम्हाला उठावयास थोडासा उशीर झाल्याने आम्ही त्या बंगल्याबाहेर उशीरा पोहोचलो. आम्ही फुले गोळा करीत असतानाच बंगल्याचा दरवाजा उघडला गेला. माझ्या मनात असलेल्या चोरीच्या अपराधीपणाच्या भावनेने हातातल्या फुलांच्या परडीसह मी थिजून गेले, आता बंगल्याच्या दरवाजातून बाहेर आलेली बंगल्याची मालकीण आम्हाला काय म्हणते या मनातल्या विचारांनी मी घाबरून गेले. क्षमायाचनचे भाव बहुधा माझ्या चेहऱ्यावर आले असावेत. मी घाबरून आजीकडे डोळयाच्या एका कोपऱ्यातून बघत होते, आजीने हसुन, त्या बंगल्याच्या मालकीणीकडे बघितले. बंगल्याच्या मालकीणीची आणि आजीची चांगलीच ओळख असावी. “काकू आता चहा प्यायल्याशिवाय मी तुम्हाला जावू देणार नाही” असे म्हणून त्या बंगल्याच्या मालकीणीने आम्हाला घरात बोलावले. आजी मोकळेपणाने तिच्याशी गप्पा मारीत होती. तिने माझी शाळा, माझ्या मैत्रिणी यांचीही चैकशी केली.

आम्ही घरी परत येत असतांना, माझ्या मनातील चोरीची, अपराधीपणाची भावना मी आजीला बोलून दाखवल्याबरोबर आजी हसावयास लागली. “दोन वर्षापूर्वीच मी त्यांच्याशी बोलले आहे की, तुमच्या पारिजातकाच्या झाडाची खाली पडलेली फुले आम्ही वेचून आमच्या देवासाठी नेली तर चालेल का? त्यावर त्यांनी परवानगी दिली, एवढेच नाही तर पहाटे उठून त्या कंपाउंडच्या फाटकाचे कुलूपही काढून ठेवतात, म्हणूनच आपण रोज फुले वेचून घेऊ शकतो ना!” आजीने हे मला सांगितल्यावर “मग आपण एवढया पहाटे कशाला येतो?” हा प्रश्न मी उतावीळपणे विचारला तेव्हा आजी हसत म्हणाली ‘‘आपल्या देवांसाठी फुले नेताना ती पायदळी तुडवलेली नसावीत, म्हणून ती गोळा करण्यासाठी पहाटे पहाटे आपण येतो. अशी खराब झालेली फुले आपल्या देवाला चालतील का?” आजीचे हे बोलणे ऐकताच, एका क्षणात मला मोकळे मोकळे वाटले. पहाटे आपण देवासाठी फुले चोरून नेतो ही अपराधीपणाची भावना नष्ट झाली. अतिशय सहजपणे, मोकळया आणि मला समजेल अशा नेमक्या शब्दात, माझ्या मनातील अपराधीपणाची भावना दूर करणाऱ्या आजीचा त्या क्षणी मला खूप अभिमान वाटला. त्या रात्री झोपतांना, मला न मागता घेणे आणि विनंती करून घेणे यातला फरक तर समजलाच. पण देवांना पारिजातकाच्या फुलांचा हार मिळण्यासाठी तिचा निस्वार्थ दृष्टीकोनही जाणवला. आपल्या कोणत्याही कृतीमुळे आजूबाजूच्या कोणालाही त्रास होणार नाही, याची काळजी घेत परमेश्वर चरणी अर्पण केलेली फुले पाहिल्यावर, चांगले आशिर्वाद देण्याशिवाय त्या परमेश्वराकडे तरी काही पर्याय उरतो का?

भारतापासून साता समुद्रापलिकडे असणाऱ्या या अमेरिकेच्या भूमीत, आजीने आमच्या मनात रूजवलेल्या चांगल्या गोष्टी, चांगले संस्कार, चांगल्या सवयी आम्हाला येथे आजही उपयोगाला येतात. अनेक प्रसंगात हे जाणवते, लक्षात येते, आणि आम्हाला लाभलेल्या आजीचा खूप अभिमानही वाटतो. आठवणींच्या या पारिजातकामध्ये, भारतातल्याच नव्हे तर जगातल्या सगळयाच आजी आजोबांना त्रिवार वंदन!!!!

**- श्रुती पाटणकर**

# भले बुरे जे घडून गेले

## एक Philosophical View on Life.

गाण्याची आवड आपल्या सगळ्यांनाच असते. आपण गाणी म्हणू शकलो नाही तरी आपल्याला ती गाणी गुणगुणावीशी तर नक्कीच वाटतात. काही गाणी उडती असतात तर काही गाणी अगदी आपल्या मनाच्या जवळ असतात. का? माहिती आहे? कारण ती आपल्या जीवनाच्या जवळ असतात. अशी गाणी आपले जीवन चांगल्या प्रकारे express करू शकतात. त्याच्यातून काहीतरी शिकता येतं, बोध घेता येतो. आता हेच गाणं बघा ना!

भले बुरे जे घडून गेले,
विसरून जाऊ सारे क्षणभर.
जरा विसावू ह्या वळणावर, ह्या वळणावर....

आयुष्य म्हटलं की चांगल्या, वाईट गोष्टींचा प्रभाव हा काही ना काही प्रमाणात आपल्या सगळ्यांच्याच जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. चढउतार हे कोणाच्या जीवनात नसतात! ते असतातच. जिथे चढ-उतार तिथे संघर्ष हा असतोच. आयुष्यातले काही झटके आणि खटके बरंच काही शिकवून जातात. चांगल्या गोष्टी ह्या अत्तरासारख्या असतात. त्या नक्कीच सगळ्यांकडे असतात पण त्याला टिकवून आणि धरून ठेवणं हे सगळ्यांना नाही जमत. त्याच्यासाठी एक वेगळी मनाची शक्ती लागते आणि ती कधीकधी आपल्या विचारातून तर कधी गाण्यातून मिळते. वाईट गोष्टी विसरून चांगल्या गोष्टीची आठवण सतत मनात रुजवावी लागते. त्याच्यासाठी जीवनाला आकार देणारी चांगली गाणी आपलं आयुष्य बदलण्यासाठी नक्कीच मदत करतात.

कसे कोठुनी येतो आपण? कसे नकळता जातो गुंतून.
उगाच हसतो, उगाच रुसतो: क्षणात आतुर, क्षणात कातर
जरा विसावू ह्या वळणावर ह्या वळणावर.....

आपल्या आयुष्यात वेगवेगळी लोकं येत असतात. काही जण नकळत आपल्या जीवनाचा भाग बनून जातात तर काही आपल्या जीवनातून कधी निघून जातात ते कळत नाही. काही जणांबरोबर आपले विचार जमतात तर काही जणांबरोबर नाही जमत. काही जण समोर दिसले की प्रेम उफाळून येते; एक प्रकारची तरतरी जाणवते. तर काही लोकांना पाहिलं तरी ह्याला आत्ताच टपकायचं होत का? असं जाणवतं. असं का होत असेल? तर माणसं आपल्या स्वतःच्या नजरेतून सगळ्या गोष्टी बघायचं सोडत नाही. त्यांना वाटत आपण जो विचार करतो, तेच खरं बाकी सब कुछ झूठ! स्वच्छ मनाने बघायचेच असेल तर ते माणुसकीच्या भिंगातून बघावे लागेल. आयुष्य आनंदी करण्यासाठी कधी कधी आवडणाऱ्या व्यक्तीकडे आणि न आवडणाऱ्या व्यक्तीकडे अलिप्त होऊन बघता येणं जरुरी आहे. तुम्ही नक्की बघा, आपल्या आसपास खूप स्वभावाने गोड प्रेमळ लोक आहेत, ते पण आयुष्याच्या चढउतारातून जात असतात. चुका नक्कीच दिसतील पण त्याचा अर्थ लागेल. प्रयत्न तर करा. तेव्हा जरा विसावू ह्या वळणावर.

कधी ऊन तर कधी सावली,
कधी चांदणे कधी काहिली
गोड करुनिया घेतो सारे, लावुनिया प्रीतीची झालर

गोड कटू अनुभवांबद्दलचा आपल्याला वाटणारा आनंद आणि दुःख सतत आपल्या अवतीभवती फिरत असतात. पण दुःखाचे सावट, अहंकाराची सावली नकारात्मक विचारांचा फेर आपल्याभोवती धरायला लागते. ही नकारात्कमता वादळासारखी येते, आपल्या प्रचंड बुद्धीवर राक्षसी आक्रमण कधी करते तेच समजत नाही. मग आपण नको नको ते विचार करायला लागतो. अशावेळेला आपण आपल्या आजूबाजूला असेलेली चांगली लोकं, त्यांचा चांगलेपणा बघू शकत नाही . परत आपण आहोत तिथेच येतो. No improvements in thoughts पण काही असो Life is too precious त्याचा सन्मान हा करायलाच पाहिजे. आयुष्य आपल्याला जेवढं शिकवतं तेवढं कोणीच नाही शिकवू शकत. तेच आपला खरा गुरु आहे. प्रत्येकाच्या आयुष्याचा सन्मान करत व प्रीतीची झालर लावत प्रत्येक क्षण celebrate करता यायला हवा.

खेळ जुना हा युगायुगांचा, रोज नव्याने खेळायचा
डाव रंगता मनासारखा, कुठली हुरहुर कसले काहूर
जरा विसावू या वळणावर

हा खेळ जुना आणि युगायुगांचा आहे. आयुष्य जगणं ही कला आहे आणि ते रंगवणं आणि आयुष्य रंगीबेरंगी करणं हे आपल्या हातात आहे, नाही का? सुख आणि दुःख ह्या जीवनाच्या दोन बाजू आहेत. ह्या आपण टाळू नाही शकत. निराशा असलेल्या मनाला उभारी देणारं हे गाणं बरंच काही आपल्याला शिकवून जातं. प्रत्येकाला आपल्यासाठीच हे गाणं आहे असं वाटणारं गाणं म्हणजे जीवन जगत असतानाचं वास्तव्य मांडत आहे. आपण शांतपणे विचार करत मनावरचा ताण नक्कीच कमी करू शकतो. मार्मिक पण अर्थपूर्ण हे गाणं तुम्हाला नक्की आवडेल आणि शिकवून जाईल. तुमचं सर्वांचं जीवन सुख समाधान आणि जीवनाला अर्थ देणार रहावो हीच सदिच्छा!
जरा विसावू या वळणावर या वळणावर.

- **आरती कुंटे-लोटलीकर**

---

## पुन्हा नव्याने

सावरून स्वतःला ताठ रहावे उभे
पुन्हा नव्याने घ्यावा श्वास मुक्तपणे

असोत किती वेदना जुन्या जीवघेण्या
पुन्हा नव्याने गावे मजेत जीवनगाणे

गुज सांगावे वाऱ्याला, स्वच्छंदी फिरावे
पुन्हा नव्याने व्हावे झाड बहरलेले

फुलावे, हसावे, आनंदाचे दान द्यावे
पुन्हा नव्याने शोधावे अर्थ जगण्यातले

**- अश्विनी क्षीरसागर**

## हास्यकट्टा 😆😆😆

"आधीच्या ठिकाणी काय काम करायचात?"
"स्वयंपाकाचं काम होतं माझ्याकडे"
"मग, ते का सोडलंत? पगार कमी होता का?"

"नाही, पगार चांगला होता. **पण मलाही तिथेच जेवून जा म्हणायचे.**"

समोरच्या अपार्टमेंट मधील ती पाच मिनिटे हात हलवत होती. मग मी पण हात केला.

तेवढ्यात बायकोने मागून सांगितले, "ती खिडकीची काच पुसतेय "

**संकलन - विनय पवार**

# "प्रेम पर्बत"

नमस्कार वाचकहो, आपल्या गाण्याने ज्यांनी अखिल रसिकजनांचे आयुष्य समृद्ध केलंय त्या गानसरस्वती लतादीदींना मी हा माझा लेखन प्रपंच समर्पित करते!

हिरव्यागार पर्वतरांगेतून वाहत येणाऱ्या एखाद्या अल्लड, अवखळ नदीसारखा "धा गे न ति नक धि ना " चा ताल धरलेला केरवा, अप्रतिम गोडव्याची बासरी, आणि मंत्रमुग्ध करणारा लतादिदींचा स्वर असा मेळ साधत उमटतो तो पहाडांमधून घुमणारा आवाज -

"ये दिल और उनकी निगाहोके साए!", हमे घेर लेते है बाहो के साए! "

१९७३ साली प्रदर्शित झालेल्या "प्रेम पर्बत" या चित्रपटातले हे सुप्रसिद्ध गीत लिहिले आहे ख्यातनाम गजल रचनाकार जाँ निसार अख्तर यांनी आणि स्वरबद्ध केलंय जयदेव यांनी. अभि ना जाओ छोड कर, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, असे एकेक मास्टर पीस ज्यांनी रचले तेच हे प्रतिभावान संगीतकार जयदेव. हा चित्रपट मात्र त्याच्या कथेपेक्षाही त्यातील सुमधुर गाण्यांनी जास्त गाजला. याच्या प्रिंट्स ज्या स्टुडिओ मध्ये जतन केल्या होत्या, त्याला लागलेल्या दुर्दैवी आगीमुळे त्या जळून खाक झाल्या, आणि नंतर मात्र ही गाणी केवळ ध्वनीरूपात जतन केली गेली. आता सुद्धा YouTube वर हे गाणे जरूर "ऐकायला " मिळेल. मंडळी, मी "ऐकायला मिळेल " असे मुद्दाम म्हटले कारण YouTube वर गाणे अपलोड करताना व्हीडीओ हवाच या पोकळ अट्टाहासापायी या गाण्याच्या ऑडिओ जोडीला, ओरिजिनल विडिओ उपलब्ध नसल्यामुळे मधुमतीच्या "आजा रे परदेसी" या गाण्याचा विडिओ जोडलाय. म्हणजे खरे सांगायचे झाले तर कान जे ऐकतात आणि डोळे जे पाहतात त्यांचा कुठेच मेळ बसत नाही. त्यामुळे हे गाणे केवळ आणि केवळ (डोळे मिटून) ऐकावे या ठाम मताची मी आहे.

चला, तर पुन्हा मूळ गाण्याकडे वळूया.
"पहाडो को चंचल किरण चुमती है, हवा हर नदीका बदन चुमती है, यहाँसे वहा तक, है चाहोके साए"

असे पहिले कडवे सुरु झाले की मन हळुवारपणे त्या पहाडांमध्ये जाऊन पोचते. नगाधिराज हिमालय असो वा आपला माऊंट रेनियर, त्या पहाडांमधून फिरताना संथ हवा वाहत असावी, बाजूने एखादी लीडर/अलकनंदा नदी किंवा आपली व्हाईट वा Nisqually नदी अखंड खळाळत असावी, आणि सोबत या गाण्याची रेकॉर्ड. हा एक स्वर्गीय आणि श्रवणीय अनुभव असतो.

"लिपटते ये पेडों से बादल घनेरे,ये पल पल उजाले ये पल पल अंधेरे!
बहुत ठंडी ठंडी है राहो के साए..ये दिल और उनकी निगाहो के साए!"

अहो हे वर्णन तर आपल्या ऑलिम्पिक पर्वत रांगांमधून दिसणाऱ्या "Hurricane Ridge" चे आहे की.
सूर्य किरणेही दिसत नाहीत, इतक्या गर्द वनांमधून प्रवास करत, ढगांमधून वाट शोधत जेव्हा आपण उंचावर चढत जातो, आणि माथा गाठतो, तेव्हा अगदी हेच तर अनुभवतो.

"धडकते है दिल कितनी आजादियोंसे, बहोत मिलते जुलते है इन वादियों से,
मुहब्बतकी रंगीन पनाहों के साए..ये दिल और उनकी निग़ाहों के साए !

निसर्गाच्या सानिध्यात क्षणभर साऱ्या काळज्या विसरून मनाने हलके व्हावे आणि हृदयातून येणारी आपलीच मुक्त स्पंदने डोळे मिटून अनुभवावीत! किती सहजतेने जाँ निसारजींचे शब्द निसर्गाशी तादात्म्य भाव साधायचे सुचवतात. हा अनुभव शब्दातीत असतो, परमोच्च कोटींचा असतो जो पुढे आपण घरी परतल्यावर साथ करत राहतो, आणि नवी उर्मी देत राहतो. वाचकहो, Skagit valley ला ट्युलिप्स पाहायला जाताना जशी सिलसिलाची गाणी ऐकत जाणे म्हणजे "शास्त्र असते ते", अगदी त्याच धर्तीवर माझ्यासाठी या पर्वराजींमधून फिरताना हे गाणे ऐकणे हेच "शास्त्र" आहे.

तुमची आहे का अशी कुठली ‘Must have playlist’? मलाही आवडतील तुमच्या मनातली गाणी ऐकायला! मंडळाच्या एखाद्या कार्यक्रमाला भेट होईलच, तेव्हा नक्की सांगाल! तोवर छान छान गाणी ऐकत रहा!

**- सौ. श्रद्धा कुलकर्णी**

---

## निःशब्द

भाववेड्या अत्तराचे थेंब काही सांडले
सांडले शब्दात माझ्या जे कधी ना बोलले
मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले

मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले
अनोळखी सूर काही आठवांनी छेडिले छेडिले
शब्दांस माझ्या गीत त्यांचे जाहले
मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले

मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले
स्वप्न माझे त्या नभीच्या चांदण्यांशी बोलले
बोलले जे शब्द माझे चांदण्यांनी नाहले
मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले

मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले
कळ अशी उठली म्हणाली मी अधुरी राहिले
राहिले स्पर्शायचे जे स्पर्शुनी शब्दास गेले
मी तुला हळुवार जेव्हा काळजाशी बांधले .



## शब्दसूर

शब्द असो व सूर असू दे
ताल असो वा लय उमटू दे
अस्तित्वाला अव्यक्ताचा
प्रशांत शीतल स्पर्श कळू दे

सूर बोलती कधी शब्दवीण
कधी शब्दांचीच सुरेख गुंफण
शब्द सुरातीत, सूर शब्दातीत
नकळत अलगद हृदय छेडू दे

शब्द सुरांचे होई गाणे
आभाळाचे असीम देणे
झोळीभरुनी घेता घेता
माझे मजला रिक्त होऊ दे



**- शीतल पटवर्धन-बापट**

# तल्लीन गोविंदे

**अभंग:** संत श्री ज्ञानेश्वर महाराज **गायक**: श्री सुरेश वाडकर **संगीत**: श्रीधर सुधीर फडके

*तल्लीन गोविंदे, तल्लीन गोविंदे पावया छंदे तल्लीन गोविंदे*
*नाचती आनंदे, नाचती आनंदे.. गोपाळ कैसे*
*तल्लीन गोविंदे, तल्लीन गोविंदे*

मनाला आनंदी आणि तल्लीन करून जाणारी, पंडीत श्रीधर फडके जी यांची प्रफुल्लित संगीत रचना, संत श्री ज्ञानेश्वर महाराजांची गोविंदमय अभंग वाणी आणि पंडीत सुरेश वाडकर जीं चे मंत्रमुग्ध सुमधुर सुर, हे सारे जेव्हा जुळून एकाच गीतात येतात तेव्हा आपले मन आपले न रहाता फक्त त्या गोपाळाचे होऊन जाते. आणि याच गोपाळ गजरात हे मन प्रेमभक्तीच्या आनंदाने तल्लीन होऊन विठ्ठलाच्या वारीला जावयास निघते.



हे गीत अशा सुंदर पध्दतीने साकार होणे, ते श्रोत्यांना ऐकायला मिळणे हे एक सौभाग्यच आहे, नाही का? माझ्यासारख्या शिकाऊ विद्यार्थीनीला ते प्रत्यक्षात पंडीत श्रीघर फडके काकांकडून शिकावयास मिळणे हा जणू काही श्रीकृष्णाचा आशीर्वादच आहे. खरे तर माझ्यासारख्या एका शिकाऊ विद्यार्थीनीला या गीताबदद्ल मनोगत लिहावयाची संधी मिळणे हे देखील माझे भाग्यच आहे. या गीताबद्दल लिहीत असताना देखील माझे मन फक्त आनंदातच तल्लीन होऊन जाते. मी माझ्या आजूबाजूचा अंध:कार पूर्णपणे विसरून जाते. अभंगामधील प्रत्येक स्वर आणि शब्द अशा सुंदर रीतीने जुळून आले आहेत की असे वाटते सूर म्हणजे श्रीकृष्ण आणि शब्द म्हणजे गोकुळ.

ज्या प्रमाणे गोकुळासाठी श्रीकृष्ण जन्माला आले त्याचप्रमाणे श्रीधरजींने दिलेले संगीत आणि या अभंगाचे बोल हे एकमेकांसाठीच जन्माला आले आहेत जणू. अभंगातील प्रत्येक ओळीचे संगीत आपल्याला गोकुळात घेऊन जाते.

यमुनेच्या तीरी,गाई चारी हरी.. (हरी हरी...) गोपाळ गजरी आनंदले....आनंsssदले तल्लीन गोविंदे...
ठायी ठायी मातु, पेंद्या पै नाचतू, वाकुल्या दावितो हरी. (हरी हरी.....)
वाकुल्या दावितो हरी. (छंदे छंदे.....) छंssssदे तल्लीन गोविंदे

श्रीकृष्णाचा पावा, यमुनेच्या तीरावर चरणाऱ्या गायी, पाव्याच्या संगीताने आनंदी होऊन नाचणारे गोकुळ, सखासोयरा पेंद्या आणि इतर गोप; आणि सर्वत्र फक्त प्रेम आणि भक्ती रस, अशा सुंदर वर्णनाचा संत ज्ञानेश्वरांचा हा अभंग आनंदाने गात वारकरी मंडळी नाचत गात कृष्ण-रंगात दंग होऊन विठ्ठलाच्या भेटीस निघाले आहेत.

ठायी ठाकी उभ्या विसरल्या, माया हाती तू लवलाया. (कृष्ण हरी,कृष्ण हरी....) ज्ञानदेवा जीवी, कृष्ण चिरंजीवी
गोपाळ रंजवी.... प्रेमभक्ता, प्रेमभक्ता.. प्रेमssssभक्ता, तल्लीन गोविंदे..

संगीतामधून भक्तांना फक्त विठ्ठलाच्या आणि श्रीकृष्णाच्या प्रेमाचा आनंद मिळतो. आणि या प्रेमाच्या आनंदातच भक्त वारी करतो. बिकट परिस्थिती मध्ये जर फक्त आनंदी रहायचे असेल तर हा अभंग जरूर ऐका, आपणा सर्वांना आनंदी, समाधानी आणि आरोग्यदायी जीवन लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. श्री राधे कृष्ण!!!

**- मोनाली गिरीश आदक**

# मराठी आम्ही असे बोलतो मराठी

मराठी माणसांनी मराठी बाणा नि मराठी अस्मिता जपण्यासाठी लिहिताना व बोलताना जास्तीत जास्त मराठी शब्दांचा वापर करावा असे बहुतेकांचे मत असल्याचा समज आहे. मराठी माणसं बोलताना ऐकली की मात्र काहीतरी वेगळेच जाणवते. मराठी भाषेत पाहुणे म्हणून आलेले बरेचसे शब्द आता घरचेच होऊन बसले आहेत

सहलीला जाम मजा आली असं म्हटल्यावर दुसऱ्याला नाही कळले तर? त्यापेक्षा आम्ही "trip enjoy" केली म्हटलं तर बरे. मी दिलगिरी व्यक्त करतो न म्हणता I am sorry म्हटले तर समोरचा माफ करतो. डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधाच्या गोळ्या आपण औषधाच्या दुकानातून नव्हे तर "medical store" मधून आणतो. परीक्षेचा पेपर कसा गेला असं विचारलं तर सोप्पा होता न म्हणता "easy" होता म्हटलं की दुसऱ्याचे समाधान होते. धन्यवाद! असे म्हणणे बावळटपणा ठरतो. त्याऐवजी "Thanks किंवा "Thank You" ऐकून ऐकणारा "धन्य" होतो. मी कामात व्यस्त आहे न म्हणता मी "busy" आहे म्हटले म्हणजे आपल्याला सध्या वेळ नाही हे दुसऱ्याला कळते. तुझी कल्पना सुंदर आहे म्हणणे कानाला गोड वाटत नाही. "Wonderful Idea" ऐकून मन सुखावते. बँकेतील खात्यात शिल्लक किती आहे असे बँकेत न बोलता account मध्ये balance किती आहे असं staff ला समजेल असे बोलावे लागते.
तणाव शब्द ऐकून आपले tension वाढते. शुक्रवारी चित्रपट प्रदर्शित न होता picture release होत असतो. पगार विचारला तर ते कमीपणाचे वाटते. Package जाणून घ्यायचं असतं. शाळा, महाविद्यालयात प्रवेश शुल्क नाही तर "admission fee" असते. पत्ते खेळताना काही जण हातचलाखी असं न म्हणता cheating करतात म्हटलेले बरे वाटते. निवडणुकीतील उमेदवाराची अनामत रक्कम नाही तर deposit जप्त होते. दिवसभरात ठरविलेल्या गोष्टी अगदी ठरल्याप्रमाणे झाल्या तर as per schedule झाल्या असं होतं. पत्र गोपनीय नसतात तर ती confidential असतात. सामना अनिर्णित न राहता a match draw होत असते. परीक्षेचा निकाल कधी लागणार त्या ऐवजी result केव्हा म्हटलं म्हणजे matter clear होते. एखाद्या कलेत अभिरुची आहे म्हणताना अवघडल्यासारखे होते. पण त्या ऐवजी interest शब्द वापरला तर ऐकणाऱ्याला पण interesting वाटते.
आज मन:स्थिती बरोबर नाही असे एखाद्याने ऐकलं तर तो काहीसा गोंधळतो. पण mood off झालाय म्हटले म्हणजे ऐकणाऱ्याला नक्की problem लक्षात येतो. शिक्षकांनी हस्ताक्षर न म्हणता handwriting सुधारा असे मुलांना सांगितले म्हणजे चटकन कळते. तसेच गणवेश वापरा अशी सूचना न देता uniform वापरा असे सांगावे लागते. गृहपाठ करून आणलास का असे न विचारता Homework करून आणलस का असे म्हटले म्हणजे वर्गातल्या मुलाची tube पेटते व तो लगेच वही म्हणजे notebook काढून दाखवितो. सेवा निवृत्ती वेतन घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना काळजी नसते असं न म्हणता pension घेणाऱ्या senior citizen ना tension नसतं. एखाद्या गोष्टीला पर्याय नाही असे म्हणायला कससचं वाटते. पण त्याला option नाही किंवा choice नाही म्हटले की position clear होते.

बोलताना कितीतरी इंगजी शब्द सहजपणे सर्रास वापरले जातात आणि त्यासाठी मराठी शब्द उपलब्ध असताना. सध्या जे इंगजी शब्द वारंवार वापरले जातात त्यासाठी मराठी शब्द अस्तित्वात होते असे कालांतराने आजच्या मराठी भाषेचा आग्रह धरणाऱ्या मंडळीना म्हणावं लागेल. कालौघात आजची मराठी भाषेचा हिरीरीने पुरस्कार करणारी ही मंडळी काळाच्या पडद्याआड जातील आणि असे बरेचसे मराठी शब्द अल्पावधीतच होतील नि:शब्द!

- **प्रा. सुहास पटवर्धन**

# डायरी

**2nd August**
आज माझा Birthday होता, पपानी सगळ्यात costly American chocolates आणली होती शाळेत वाटायला. सगळी मुले एकदम jealous होऊन पहात होती माझ्याकडे. I felt like outsider. माझ्या richness मुळे ती मला त्यांच्यात include करायची नाही. खरं तर मला साधी किटकॅट आणायची होती, मला खूप आवडतात ती, खाताना कसा कर्रम कुर्रम असा आवाज येतो त्याचा, पण पपा म्हणाला भिकारडी चॉकलेट्स खायची नाहीत. भिकारडी म्हणजे????? पपा ममाला का विचारले पाहिजे. बघू या कधी भेटतात ते मला ते.

**3rd August**
काल दिवसभर जाम बिझी होतो. सकाळी school मध्ये आणि then in the evening. Papa arranged a party at McDonald's. खूप मजा केली आम्ही सगळ्यांनी. खूप gifts मिळाल्या मला. मला पपाशी बोलायचे होते पण तो कुठे दिसत नव्हता. ममा कडे गेलो तर ती म्हणाली,"I am busy with my friends,,will talk later." रात्री त्यांच्या बेडरूम मध्ये गेलो तर पपा म्हणाला, Now you are eight year old grown up boy, go and sleep in your bedroom" मला त्यांच्या बरोबर गप्पा मारायच्या होत्या ,काही तरी विचारायचे होते, पण हल्ली असेच होते त्यांना माझ्या साठी वेळच नसतो.

**4th August**
जाम कंटाळा आला आहे मला. दिवसभर कोणीच नसते घरात. मी दुपारी शाळेतून आलो की दीदी असते घरात. पण ती सारखी काहीतरी काम करत असते. Evening ला ती मला खाली सोसायटी गार्डन मध्ये घेऊन जाते, ना माझ्याशी गप्पा मारत, ना ओरडत, ना खेळत. तशी ती चांगली आहे पण मला नाही आवडत ती. मग मी ओरडतो तिच्या अंगावर आणि रागावून रूम मध्ये जाऊन बसतो. ममा पपा आले की तिला म्हणतात,"don't disturb him, जेवला आहे ना तो, झोपू दे त्याला," आणि मग मला आणखीच राग येतो. पण मग रडत रडत मी झोपलो कधी तेच मला कळत नाही.

**5th August**
Mumma, I am missing you very much. आज तरी लवकर ये ना ग घरी.
हॅलो मम्मा मी बोलातोय, लवकर ये ना घरी. मला कंटाळा आलाय, नको... मला नाही जायचे बाहेर कुठे, बागेत पण नाही. तू घरी ये. ओरडत नाही आहे मी. but I want you Mumma, तू घरी ये. वरण भात तूप खाऊ या आपण, तू भरव मला. मम्मा ... मम्मा.... हॅलो मम्मा..
दीदीने वरण भात तूप केला होता. मस्त झाला होता, गरम गरम खूप खाल्ला मी. पण मग उगीचच रडू यायला लागले मला, खूप चिडलो दीदीवर आणि मग खूप मारले पण तिला .मग ती आणि मी मिठी मारून एकमेकांना रडत बसलो. दीदी खरंच खूप चांगली आहे..पण मला का तिचा इतका राग येतो......

खूप खूप confused आहे मी. दीदी जवळ आहे तर ती नको आहे. मला मम्मा पपा हवे आहेत ते मिळत नाहीत. पण आता मी ठरवले आहे, मी बोलणारच नाही आहे त्यांच्याशी आज पासून.
मम्मा घरी आली पण मी बोललोच नाही तिच्याशी. तिने जवळ घेतले आणि विचारले, "आवडला का पिलाला वरण भात? दिवसभर खूप बिझी होते रे राजा, म्हणून दीदीला सांगितला करायला. बोल की रे राजा माझ्याशी... अरे बाप रे! रागवले आहे का एक माणूस, बरे मग एक घट्ट huggati hugg दिली की जाईल ना राग? अरे...अरे .. वरुण पडेन ना रे

मी ... वरुण.... वरुण.
....दिली ढकलून तिला आणि आलो रूम मध्ये धावत, आता येईल माझ्या मागे मस्का मारायला, मग खूप बोलेन मी तिच्याशी...तिला घट्ट मिठी मारीन आणि सांगेन..,"मम्मा I am missing you".

**6th August**

Yesterday till eleven I was awake. पण मम्मा आलीच नाही. तसाच झोपलो. सकाळी उठलो तर मम्मा गेली होती ऑफिसला. पण पपा होता घरी. मी धावत जाऊन त्याला मिठी मारली, पपा चल ना आपण आज धमाल करू तू आज जाऊ नको ऑफिस ला.
We will go out to the sea shore, I want to have bhel and ice gola. कसा असतो रे तो .माझ्या स्कूल मधली सगळी मुलं खातात. त्यांना खूप आवडते. चल ना रे....
वरुण, can't you see I am busy with my office? आणि no समुद्र नो गोळा, वाईट असते ते. All rubbish! अमेरिकेतून अचानक इकडे यायला लागल्यामुळे वर्षाच्या मध्ये तुला international स्कूल मध्ये admission मिळाली नाही. पण मग ही शाळा. I am fed up with this. काय ही middle class mentality.
Middle class Mentality????? म्हणजे? पपा तर नीट बोलतच नाहीआज काल, सारखा चिडलेला असतो. US मध्ये किती छान असायचा तो. तो मी आणि मम्मा आम्ही किती मजा करायचो. Weekend तर only for three of us. काय झाले मग अचानक? का आलो आम्ही इकडे? आणि इकडे Saturday, Sunday सुद्धा दोघेही काम करतात. मग पपा चिडतो, मम्मा तर सारखी रडतच असते. पण मला आवडली इंडिया. मजा येते, मित्र शाळा दिदी सगळे छान आहे. आज आली ना मम्मा की sorry म्हणेन मी तिला....

**7th August**.

सकाळी जाग आली तर मम्माच्या परफ्यूम चा मस्त वास आला. मम्मा ......करत मी धावत तिच्या कडे गेलो आणि तिला घट्ट मिठी मारली. आम्ही दोघे किती वेळ तसेच बसून होतो, मग मम्मा म्हणली, "चला थालीपीठ कोणाला हवे आहे. गरम गरम थालीपीठ आणि मस्त साजूक तूप...."
yuuuuuummmyy mummmmmy ...करत मी तिच्यामागे किचन मध्ये गेलो.
दिदी खूप चांगली आहे पण ती मम्मा नाही आहे ना ... म्हणून मला ती आवडत नाही... हि हि हि....

**9th August**

आज Saturday होता. मम्मा पपानी सुट्टी घेतली होती. आम्ही मम्माच्या मावशीकडे म्हणजे मावशी आजीकडे चाललो होतो. मी कधीच आजी बघितली नव्हती. अमेरिकेतल्या आज्या फ्रॉक घालतात, पँट घालतात. पण ही आजी एकदम funny साडी नेसली होती .पँट सारखी पण साडी. आणि ती हसली ना की तिची मान अशी toy सारखी हलत राहायची मग मला हसू यायचे. मी हसलो की ती हसायची आणि मग मी आणखीन हसायचो. खूप दिवसांनी मला इतके हसताना बघून मम्मा आणि पपा एकदम खूश झाले होते. त्यांना हसताना बघून मी आजी कडे गेलो आणि तिला thank you म्हंटले आणि सांगितले आज किती दिवसांनी हे दोघे हसत आहेत. आजीने प्रेमाने मला जवळ घेतले आणि माझे पापी घेतली. मस्त आहे ती मऊमऊ आणि खरखरीत पण. मग ती मला म्हणाली जा बाहेर खेळायला मुलांबरोबर. मी पपाकडे बघितले तर तो हो म्हणाला आणि मी लगेच उड्या मारत पळत गेलो. खूप वेळ खेळलो मी.. नवीन गेम..मला नाव पण माहित नाही. पण मजा आली. धम्माल धम्माल केली.

**11th August**
मम्मा पपानी greatest surprise gift दिले मला.......मावशी आजी ला आमच्या कडे आणले. आता मी, दिदी, आजी आम्ही खूप मजा करणार आमची एक टीम होणार...

**30th August**
मम्मा पपा पूर्वीसारखे खेळतात आता. Though little time. but I like the way they have changed now. आजी आणि दिदी बरोबर मस्त वेळ जातो, मग मला डायरी लिहायला वेळ मिळत नाही.  Thank you Aaji.
I love you, India.

********************************************

खरंच एका छोट्या दोस्ताची ही डायरी आपल्याला किती आणि काय काय शिकवून गेली कळतंय का! एका महिन्याच्या त्याच्या डायरी मध्ये त्याने अजाणतेपणी किती छान शिकवले आहे आपल्याला.
मित्रानो, ब्ल्यू व्हेल गेम डाऊनलोड करायची गरज नाही आहे तो आपल्या सगळ्यांमध्ये आहे तो ........सतत आपल्याला नवीन टास्क देत असतो.

मार्क मिळवा सगळ्यात जास्त. पण यशाचे गमक कोणाला सांगू नका....
पैसा कमवा सगळ्यांपेक्षा जास्त, काहीही आणि कसेही करून.. पण तुमच्या यशाची किल्ली देऊ नका कोणाला.
यशाच्या कीर्तीच्या पायऱ्या चढताना बघू नका खाली. किती लोकांचा किती मनाचा बळी गेला आहे विचार नका करू.
कुणालाही सहभागी करू नका तुमच्या यशात.
आयुष्यभर त्याने सांगितलेले टास्क करून घाबरे होतो आपण. आप्तस्वकीयांसाठी व्याकूळ होतो आपण,
आपल्याच वागण्यानी झालेल्या जखमांनी घायाळ होतो आपण. पण. तुमच्या यातानांचे प्रदर्शन करू नका कोणापुढे ..

आणखीन एक टास्क....आता हा शेवटचा टास्क..
आई,वडील, भाऊ, बहिण, मुले, मित्र, मैत्रीणी कुणाशीही संबंध नको, virtual जगाशी connect व्हा. सततचे लाईक्स तुम्हाला motivate करतात, appreciation ने तुम्हाला बरे वाटते आणि मुख्य म्हणजे कोणाचेच कसल्याच अपेक्षांचे ओझे नसते आपल्या खांद्यावर.
आता आपण ठरवायचे कसा डिलिट करायचा हा व्हेल. मुळात त्याला वाढवायचा का? पोसायचा का? का पोसायचा???
तेव्हा वेळीच जागे व्हा. त्याला बाहेर काढा. आपल्या नात्याची वीण आणि तिचे जाळे इतके घट्ट करा की असे अनेक व्हेल त्यात पकडून tank मध्ये कैद करून ठेवू.  काय वाटते तुम्हाला?

**- श्रद्धा राजेश**



## हास्यकट्टा 😆😆😆

अहो ते ससून हॉस्पिटलला कसं जायचं?

पुणेकर: या! असे रस्त्याच्या मधोमध उभे रहा!

**संकलन - विनय पवार**

# उत्तर

'"झुंजुमुंजू झाले आणि फटफटले'. अर्थ एकच. उजाडल. पहाट झाली." सर म्हणाले.

"झुंजुमुंजू हा शब्द कोमल मंजुळ वाटतो. पहाट झाल्यावर पक्षी चिवचिवाट करायला लागतात, गाई उठून हालचाल करायला लागल्यावर त्यांच्या गळ्यात घातलेल्या घंटांचा झणकार होतो हे सगळे अर्थ त्यात अभिप्रेत आहेत. फटफटले हा शब्द कठोर, रूक्ष, जरा गद्य वाटतो"

मागच्या बाकावर दोघीजणी काहीतरी कुजबूज करत होत्या. "'तसेच व्यसन आणि व्यासंग'. दोन्ही शब्दांचे मूळ एकच. पण अर्थ?"

"व्यसन म्हणजे" येथे सरांनी हाताचा अंगठा वर करून पिण्याचा अविर्भाव केला.

"माझा मराठीचा व्यासंग आहे. मला मराठीचे व्यसन नाही." सर म्हणाले.

क्लास हसला. मागच्या बाकावरची सुबक-ठेंगणी तर खळखळून हसली.

"व्यासंग असणारच. नाहीतर न्यूयॉर्कच्या NYU त मला कोणी प्रोफेसर केले असते का? आज नगर कॉलेजात गेस्ट लेक्चर द्यायला बोलावले असते का? नाही. अर्थात मी इथे कॉलेजात होतो तेव्हा पहिल्या बाकावर बसायचो. बॅक-बेंचर नव्हतो." सर मुलींच्या दिशेला हात करत हसत म्हणाले. "गंमतीने म्हणतो आहे हं. उगाच रागावू नका आमच्यावर. नच सुंदरी करू कोपा मजवरी धरी अनुकंपा."

दोघी लाजल्या.

"आपण अगदी स्टाइल घेऊन "ही श्रीं ची इच्छा" असे म्हणतो. सौ. ची इच्छा का म्हणत नाही? घरोघरी कोणाची इच्छा चालते हे तर आपल्याला माहितीच आहे." सर रंगात आले होते.

"आणखी एक उदाहरण. मद, उन्मेष, उन्माद, मात, माज. शब्दांचे मूळ एकच. पण अर्थ वेगवेगळे. आनंद, उत्साह, माज, रग ई. "सांगण्याचा हेतू हा की शब्दांची निर्मिती कशीही झाली तरी भाषेची वाढ, समृद्धी, बदल, भाषेच्या वापरावर अवलंबून असतो. एकाच शब्दाचा अर्थ आणि अभिप्रेत असलेला अर्थ वेगळा व्हायला लागतो.

"लग्नाच्या पंगतीत पंचपक्वानांचे ताट असले तरी नवऱ्यामुलाचे लक्ष शेजारच्या पंचपक्वानाकडेच असते. Right?" सर मुलांकडे बघत म्हणाले. मुलांनी "yeah" करत दुजोरा दिला. मुलींनी नाके मुरडली. पण हसत. सुबक-ठेंगणीला तिच्या मैत्रिणीने कोपरखळी मारली. सुबक-ठेंगणी लाजून गोरीमोरी झाली.

"असो. मी माझी बडबड बंद करतो. "अभिजात मराठीचा प्रवास" हा माझा सध्याचा रिसर्च टॉपिक आहे. त्यासाठी ग्रॅजुएट स्टूडेंट्स शोधतो आहे. न्यूयॉर्कला कधी आलात तर फोन करायला विसरू नका"

क्लासने टाळ्या वाजवल्या. मुले उठून गेली. मुलींनी प्रश्न विचारायचे निमित्त काढून सरांना गराडा घातला. सुबक-ठेंगणीने लॅपटॉप बंद केला. पुस्तकं गोळा केली. काल बाबांनी "सरांच्या घरी पत्रिका देऊ का" असे विचारले होते. आजही विचारतीलच.

तिचे उत्तर तयार होते.

**- अरुण निसरगंड**

# गोट्या नाना

नानाला जाऊन आज एक वर्ष झालं. नाना पहिलीत असताना शाळेत मास्तरनी बडवला म्हणून नानांनी मास्तरांवर दगडफेक केली होती. आणि तेव्हापासून त्याच नामकरण झालं..गोटीराम उर्फ गोटीबा आणि आमचा गोट्यानाना.

संध्याकाळी मंदिरापाशी गप्पा मारत असताना नानाने ही गोष्ट कितीदा तरी रंगवून सांगितली..
"असा गोटा घेतला.. अन हे असा हणातो कणी, परत काय मास्तर जवळ येईल. जे ढुंगाला पाय लावून पळलो साळतून, तेव्हापासून साळा सुटली ती कायमची." असा गोटा घेतला म्हणताना तो पायाजवळचा मिळेल तो दगड हातात घ्यायचा. असल्या साध्या साध्या गोष्टी नाना रंगवून आणि वाढवुन सांगायचा. त्याला त्याची भारी मजा यायची. आणि आमचीपण भारी करमणूक व्हायची. कदाचित त्यामुळेच तो माझा चुलत आजोबा असूनही मित्रांसारखाच वाटायचा.

डोक्यावर टोपी, अंगात बंडी, गुडघ्यापर्यंतच धोतर, पायात रबरी बूट असल्या पेहेरावातला नाना घड्याळ मात्र न चुकता घालायचा. एकूण १२ भावंडातला नाना सगळ्यात शेवटचा. त्यामुळे लहानपणी त्याचं बराच कोडकौतुक झालं असेल असा आम्हाला वाटायचं. पण एवढ्या भावंडात नानाचं खरंच कौतुक झालं की आमच्या पणजीला नानाकडं नीट बघता आलं ते तिचं तिलाच माहित. पण बाकीच्या आज्या आणि आजोबांचं नानांवर विशेष प्रेम. कदाचित शेंडेफळ असेल म्हणून असेल किंवा कदाचित नाना व्यवहारातलं काही विचारात नव्हता म्हणूनही असेल.

नानाकडे मी एक-रकमी पैसे कधीच पहिले नाही. त्याला जेमतेम आकडेमोड जमायची. पण जेव्हा कधी जवळ पैसे असायचे तेव्हा नाना आम्हाला गारीगार किंवा चिक्की घेऊन द्यायचा. शनिवारी सकाळी सकाळी शाळेत जाताना नाना हमखास रस्त्यात भेटायचा. डेअरी मधे दूध घालून आलेला. मला शाळेत जाताना पाहून नाना बंडीच्या खिशात घालायचा आणि दोन्ही बाजूला चापडून जे १० पैसे, २० पैसे सापडतील ते हातावर टेकवायचा. एक मुका घेऊन म्हणायचा "गुमानं जा बरं". त्याच्या नजरेतलं कौतुक आणि प्रेम सारं काही सांगून जायचं.

नाना कधी घरी येऊन बसला कि मला चिडवत बसायचा. आईला म्हणायचं "बाई.. याला  वैदिनीकडून विकत घेतलाय ना? आर्धी भाकर देऊन?" आईपण सुरात सूर मिळवून म्हणायची "आर्धी नाही चतकोर भाकर देऊन घेतलाय."  मग नानाच गाणं सुरु व्हायचं  "बापुडं बापुडं बापुडं.. दोन चार भाकीरांचं पापुडं"
अगदी मी मोठा होऊन माझं लग्न झालं त्यानंतरही कधी एकटा दिसलो कि नाना ते गाणं अधून मधून गायचा. नाना सारखीच निरागस त्याची गाणी होती.

आमच्या आजोबांमध्ये, चुलत काकांमध्ये बरेचदा जमिनीवरून, विहिरीवरच्या मोटारमुळे वाद झाले. नानाच्या डोक्यात कुणी काही भरवलं कि तो पण बऱ्याचदा आडमुठेपणे वागायचं. पण आम्हा पोरांशी खेळताना, बोलताना नानाने ते वाद कधीच आड येऊ दिले नाही. नाना सुशिक्षित नसला तरी सुसंकृत नक्कीच होता. पहिली नापास असून पण नानाला मराठीत सही जमायची. गिरवून गिरवून तो तेवढं शिकला होता. शाईमध्ये मुंग्या सोडून तयार झालेल्या नक्षी प्रमाणे असलेल्या त्याच्या सहीचं त्याला भारी अभिमान वाटायचा आणि आम्हालाही खूप अप्रूप वाटायचं. जगाच्या व्यवहारापेक्षा नाना शेतीच्या कामात जास्त रमायचा. सकाळच्या गुरांच्या धारा, खाणंपिणं करून नाना रानात जायचा. गुरांसाठी मका घेऊन येताना नाना एवढं मोठं ओझं आणायचा कि ते ओझं उचलायलाच २ गडी लागायचे आणि त्या ओझ्याचा आकार पाहूनच लांबून समजायचं कि तो नानाच आहे.

नाना जश्या त्याच्या गमती जमती सांगायचा तश्याच त्याच्या बैलांच्या गोष्टी सांगायचा. ८० च्या दशकात जेव्हा Skylab Space स्टेशन कोसळलं तेव्हा नानाने एक बैल विकत घेतला होता. नानाने ती बातमी कधीतरी रेडिओ वर ऐकली होती आणि नवीन आणलेल्या बैलाचं नाव नानाने कैलाब ठेवलं होतं. नाना त्याच्या आठवणीत रंगायचा. पावसाळ्यात गुरं

घेऊन डोंगरावर गेला कि आठवडाभर नाना डोंगरावरच असायचा. गावातली ५-६ लोक मिळून आठवडाभर आलटून पालटून डोंगरावर गुरं सांभाळायची आणि डोंगरावर जाताना बायका सोबत आठवड्याचा शिधा द्यायच्या तेव्हा नानीने (नानाची बायको) दिलेल्या शिध्याची आठवण नाना सांगायचा. "असा गुळाचा मलिदा करायची कांती (नानी).. असा लाडू हातात घेतला की हे तुपाची धार."  नानीच्या आठवणीत कितीदा तरी नानाने धोतरानं, बंडीने डोळे पुसले असतील. आईहुन जास्त बायकोनचं त्याच्यावर प्रेम केलं होत.

नानाला कितीदातरी रागावलेला पाहिलं असेल पण जे काही आहे ते तोंडावर भडाभडा बोलून तो संध्याकाळी मंदिरापाशी परत त्याच लोकांसोबत गप्पा मारत बसायचा. कधी गावात वरात असली कि नानासाठी एखादा पेग हळूच पोचवला जायचा. तो काही फार अवलिया माणूस नव्हता पण गावातल्या जवळपास सगळ्या वयाच्या लोकांशी त्याचं जमायचं. त्याला ना पुढारीपणाची हौस होती ना मिरवण्याची. कदाचित याच गोष्टीमुळे त्याचं सगळ्यांशी पटायचं. लहान मुलांमध्ये तो अगदी लहान होऊन मिसळायचा, तारण्या पोरांमध्ये उगाच काहीतरी चाथळ गोष्टी सांगायचा तर मोठ्यांमध्ये कधी कधी उगाच फारशी गरम करायला बैठकीत बसायचा.
सगळ्यांची आपुलकीने चौकशी करणारा नाना आमच्या घरी आलेल्या कोणत्या ही पाहुण्याला चहाचं आमंत्रण द्यायचा. नोकरीसाठी जसा पुण्याला आलो तास नानांशी संपर्क तुटत केला. सुट्टीला कधी गावाला गेलो तर आधी मधी नाना दिसायचा. जर भेट झालीच तर नाना मला पण आवर्जून म्हणायचं "घरी ये सांच्याला च्या प्यायला"

नाना गेला तेव्हा त्याला शेवटचं भेटता आलं नाही याची खंत कायम माझ्या मनात घर करून राहील. माणुसकीची, प्रेमाची भूक असलेली मोठेपणाची हाव नसलेली नानासारख्या पापभिरू माणसांची जमात आजकाल नामशेष होत चाललीये. निरपेक्षपणे प्रेम करणारी, जीव लावणारी माणसे मिळायला पण भाग्यच असावं लागत म्हणा. आणि आपलं दुर्दैव असं कि आपल्याकडे काय आहे हे आपल्यापासून दूर गेल्याशिवाय जाणवत नाही हेच खरं.

कधी घरी जाणं झालं कि नानाच्या पडवीकडे पाहून नेहमी असं वाटेल कि असाच नाना पडवीमागून चालत येईल आणि मला पाहून गाणं सुरु करेल "बापुडं बापुडं बापुडं.. दोन चार भाकीरांचं पापुडं"

**- चेतन थोरात**

## हास्यकट्टा

बायको: दोन किलो वाटाणे घेऊ का?
नवरा: हो घे ना.
बायको: तुझा सल्ला नाही मागितला रे! यासाठी विचारतेय की, तू इतके सोलू शकशील की नाही, का कमी घेऊ?

एक ज्योतिषी इंजिनीअरिंग करणा-या विद्यार्थ्याचा हात पहात होता.
ज्योतिषी: बेटा, तू खूप खूप शिकणार आहेस.
विद्यार्थी: ते माहिती आहे हो...गेल्या 10 वर्षांपासून मी शिकतोच आहे.
मला सांगा, मी पास कधी होणार?

**संकलन- अमित डोईफोडे**

# टायटॅनिक

आशिषच्या मित्राबरोबर कोकाकोला सेंटरमधून बाहेर पडलो तर खूप भूक लागली होती. रेस्टॉरंट शोधू लागलो. बऱ्याच ठिकाणांचे फोटो काढून झाल्यावर ग्राउंड डाऊन टाऊनच्या बाजारात खरेदी सुरु झाली. जवळच्या एका रेस्टॉरंट मध्ये शिरलो. व्हेज काही मिळेना. चहा कॅाफी झाली. सुरेशची मुलगी आता खूपच कंटाळली होती. तिची पोटपूजा झाल्यावर पुढे 'टायटॅनिक' प्रदर्शनला जायचे ठरले. वाटेत एका दुकानात काकाकुआ, पोपटांच्या बरोबर आशिषच्या आग्रहावरून डाऊनटाउन अटलांटाची आठवण म्हणून मी एक फोटो काढला. डेस्टिनेशनच्या लोकेशनची निश्चिती व बरीच फोनाफोनी होऊन बराच लांबचा प्रवास करून अटलांटा सिव्हिल सेंटरच्या आवारात सुरेशच्या फॅमिली सह पोचलो. टायटॅनिक या जगप्रसिद्ध अन्सिंकेबल समजल्या गेलेल्या नव्या बोटीची पहिल्याच समुद्र सफरीत इतिश्री कशी झाली, त्या प्रदर्शनाला आम्ही आलो होतो. नुकतेच एक महिन्यांसाठी ते प्रदर्शन अटलांटात आले होते. संध्याकाळचे सहा वाजून गेले होते. साधारण पाऊस पडत होता. बऱ्यापैकी थंडी होती. पण पुढे दीड दोन तास कसे गेले काही समजले नाही. तिकीट प्रौढास वीस व सीनियर सिटीझनला अठरा डॉलर्स होते.

टायटॅनिक आरटिफॅक्ट्स एक्झिबिशन हे या प्रत्येकाने पाहिलेच पाहिजे. टायटॅनिक एप्रिल 15, 1912 या दिवशी रात्री 2:20 ला उत्तर अटलांटिक महासागरात हिमनगावर धडकून बुडाली.... ते पुन्हा एप्रिल 11, 2012 पर्यंत शोधून काढलेल्या तिच्यातील सर्व गोष्टींचे, अवशेषांचे हे प्रदर्शन आहे. या महाकाय बोटीच्या बांधणीपासून ते ती बुडाल्यानंतर तिचा शोध घेणाऱ्या विविध मोहिमा, त्या कशा यशस्वी झाल्या, त्यात कोणते चित्तथरारक अनुभव आले, यासह हा मृत्यूचा अक्राळविक्राळ पट आपल्या डोळ्यांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य या प्रदर्शनात नक्कीच आहे. प्रत्येक व्यक्ती जिला या घटनेची थोडीफार माहिती आहे अगर काहीच माहिती नाही अशा प्रत्येकाला खिळवून ठेवणारे हे प्रदर्शन आहे. व्हाईटस्टार लाईन या कंपनीच्या टायटॅनिकच्या पहिल्या आणि शेवटच्या दुर्दैवी समुद्र प्रवासातील दर क्षण नि क्षण या ठिकाणी जणू जिवंत केला आहे. आत शिरताना प्रत्येकाला या लाईनच्या आर् एम् एस् टायटॅनिक बोटीत शिरण्याचा बोर्डिंग पास मिळतो. या दुर्दैवी प्रवासात सापडलेल्या दुर्दैवी प्रवाशांच्या नावचे पास दिले जातात. त्यावर त्यांची सर्व माहिती-कुठून कुठपर्यंत प्रवास करणार होता, नाव, व्यवसाय, गाव, सहप्रवाशाचे नाव, नातेवाईक कोण, प्रवासाचा क्लास, केबिन नंबर, प्रवास उद्देश्य, डेस्टिनेशन व तेथलेच तिकीट का? याचा तपशील असतो. फेडेक्स व आर् एम् एस् टायटॅनिक इन्कारपोरेटेड, ए डिव्हिजन ऑफ प्रिमिअर एक्झिबिशन या संस्थेमार्फत हा पास मिळतो. एवढ्याचसाठी की तुम्ही प्रदर्शन किती बारकाईने, काळजीपूर्वक पाहिले ते बघण्यासाठी. तुमच्या पासवरचा प्रवासी वाचला की वैकुंठाला गेला हे पहावे ही अपेक्षा. शेवटी पाहिले तर आम्हा तीघांपैकी दोन वाचले होते व एक मृत.

पैकी विल्यम्स कौट (विनि ट्रेनर) दुर्दैवी मृत. जिवंत असणाऱ्यांत नाव नव्हते. या सर्व याद्या प्रत्येकाच्या क्लासप्रमाणे करण्यात आल्या होत्या. ज्यूलीअस व्हॅन डी प्लँक, वय एकतीस, इव्हेझेल बेल्जियम, साखर कारखाना कामगार, पत्नी एमिला बरोबर, दोघे मृत. श्रीमती एम्मा बकनेल, वय साठ, फिली, पेनसिल्व्हानिया,-मेडिकल स्कूल मधे हार्वर्डला शिकणाऱ्या मुलाला भेटायला निघालेली. चेरबर्गला बोटीवर चढतानाच आपल्या मागरिट ब्राऊन या मैत्रिणींला आपण या बोटीच्या भविष्याबद्दल साशंक असल्याचे बोलली होती. एक वर्षांपूर्वी हिचा दुसरा मुलगा हॉर्वर्ड कॅनडाच्या एका बोटीतून जाताना हिमनगाला थडकून बुडालेल्या बोटीत मरण पावला होता. एमाचा नवरा बकनेल विद्यापीठाचा पेनसिल्व्हानियातील फाऊंडर मेंबर होता. एडॉल्फ सालफेल्डची कथा खरच चमत्कारिक आहे. सत्तेचाळीस वर्षांचा हा मँचेस्टर, इंग्लंडचा. एकट्याने प्रवास करणारा, सी-106, न्यूयॉर्क ते न्यूयॉर्क परतीचे फर्स्टक्लासचे तिकीट. अमेरिकेच्या भरभराटीला आलेल्या परफ्यूमच्या व्यापारातील एका परफ्यूम मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या मॅनेजरची ही कथा एखाद्या रम्य अरबी सुरस कथेत शोभेल अशीच आहे. मार्केट मधे अगदी नवीन असलेल्या विविध पासष्ठ अत्तरांचे नमुने काचेच्या छोट्या छोट्या कुप्यातून घेऊन तो निघाला होता, अमेरिकेत आपले नशीब काढायला. परत यायचे म्हणून रिटर्न तिकीट

काढलेले. बासष्ट कुप्यांपैकी बऱ्याचशा त्यांना अत्तरासह महासागराच्या अथांग पोटातून बाहेर काढण्यात यश आले. त्यापैकी काही या प्रदर्शनात जशाच्या तशा मांडण्यात आल्या आहेत.

टायटॅनिक बोटीची प्रवासाचा मार्ग, प्रत्यक्ष पहिला हिमनग केव्हा, कुठे, कसा, किती अंतरावर, किती वाजता दिसला, सूचना कोणी, कशी, कधी, केव्हा दिली, पोचली का नाही ही माहिती इथे मिळतेच. शिवाय कोणत्या इतर बोटीनी मदत केली (यामध्ये ऑलिंपिया बोटीची मदत सर्वात आधी व कार्पोथियाची महत्वाची). बोटीवर लाईफ बोट्स किती होत्या, कशा होत्या, केव्हा निघाल्या, पाण्यात बुडून किती मेले, भीतीनेच किती मेले या सर्व तपशिलात जाऊन दिलेली सर्व माहिती या प्रदर्शनात मांडणाऱ्या माणसांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. आठ-सवा आठला प्रदर्शन पाहून सुन्न मनाने बाहेर पडलो. पोटात कावळे ओरडू लागले होते. ईटरीच्या शोधात अटलांटाकडे जायला निघालो. इंडीयन कूझिनचे सपना नावाचे एक शाकाहारी हॉटेल सुरेशला ठाऊक होते. तेथे भारतीय बिर्याणी, पुरी भाजी, भजी, पापड इ. जेवणावर आडवा हात मारला. हवीहवीशी थंडी पडली होती. पुन्हा भेटण्याचे आश्वासन देत सुरेश, त्याची पत्नी व मुलीचा निरोप घेऊन घराकडे परतीच्या प्रवासाला निघालो. रात्रभर टायटॅनिकच्या चित्तथरारक प्रवासातील हजारो चित्रे डोळ्यांपुढून हलत नव्हती. खरोखर नशीब थोर म्हणूनच हे अभूतपूर्व प्रदर्शन आम्हाला पहायला मिळाले.

मी सेंट झेविअर्स हायस्कूल मध्ये कोल्हापुरला कार्पेथिया बोटीच्या कॅप्टनने लिहिलेल्या टायटॅनिक बोटीच्या इतके वर्षे मुलांना शिकविलेल्या कथेचा सारांश आठवत झोपी गेलो. त्या वर्णनावरून या समुद्री अपघाताच्या नुकसानीची, मानवी, आर्थिक हानीची कल्पना येत नव्हती. ज्या अटलांटिक महासागरावरून विमानाने प्रवास करून लंडनहून मायामी मार्गे अटलांटाला आलो त्याच महाकाय, अथांग महासागराने टायटॅनिकला गिळले हा विचार काही केल्या मनातून जाईना.

**- विनायक अग्निहोत्री**

## हास्यकट्टा 😆😆😆

- ❖ तुम्ही जर जग बदलू इच्छित असाल, तर अविवाहित असताना बदला. लग्नानंतर तुम्ही टीव्ही चॅनेल पण बदलू शकत नाही.
- ❖ वेल्डिंग आणि वेडिंग ह्या मध्ये काय फरक आहे?
  वेल्डिंग: आधी ठिणग्या मग जोड, वेडिंग: आधी जोड मग ठिणग्याच ठिणग्या

- ❖ तुम्ही पुण्याचे का?
  हो!
  पण तसे वाटत नाही.
  मग काय गळ्यात बाकरवड्यांची माळ घालून फिरू का?
  हं, आता वाटतं!! 😀

**संकलन- अमित डोईफोडे**

# आरश्यात डोकावताना

एअर इंडियाच्या विमानाने मुंबई विमानतळावरून आकाशात झेप घेतली. विमान बघता बघता २००० फूट उंचीवर स्थिरावले. त्या विमानात एक मुलगी होती, सर्वांना अपरिचित अशी. कदाचित स्वतःच्या बाबतीत सुद्धा (?) पण ह्या मुलीच्या ध्येयाची उंची त्या विमानाने गाठलेल्या उंचीपेक्षा देखिल कैकपटीने मोठी होती.

विमान न्यूयॉर्क एअरपोर्ट वर उतरले. नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेली ही मुलगी एअरपोर्टवर भिरभिरत्या नजरेने इकडे तिकडे बघत पुढे सरकत होती. तिच्या चेहऱ्यावर आनंद, कुतूहल आणि किंचित चिंता स्पष्ट दिसत होती इतका तिचा चेहरा बोलका होता. टॅक्सी मध्ये बसताना तिची छाती थोडी दडपल्यासारखी वाटत होती. आपला ह्या नवीन आणि मोठ्या शहरात कसा टिकाव लागेल ही चिंता भेडसावत होती. तिची नजर मॅनहॅटन मधील लिंकन सेंटर प्लाझा वर पडली. रात्रीच्या रोषणाई मध्ये त्याचे सौंदर्य खुलून दिसत होते. तिने एक दीर्घ श्वास घेतला आणि आलेले सर्व विचार झटकून टाकले. आता माघार नाही हे तिने स्वतः च्या मनाला ठामपणे सांगितले. टॅक्सी पुढे चालली होती आणि थकव्याने आदितीला कधी पेंग लागली हे तिला कळले देखील नाही.

ह्या गोष्टीला जेमतेम ४ वर्ष लोटली होती.
सिॲटल् च्या Hyatt Regency मध्ये गर्दी ओसंडून वाहत होती.
स्टेजवरची रोषणाई, संगीत आणि नेपथ्य हे सर्वांनाचं आकर्षित करून घेत होतं. ... आणि स्पर्धा सुरू झाली.
शेवटचा राऊंड होता. काही वेळ एकदम शांतता पसरली होती. प्रेक्षक देखील काय निकाल लागतोय ह्याकडे कान टवकारून बसले होते. निवेदकाने मोठ्याने जाहीर केले ......And the winner is...

कसली स्पर्धा होती ती? इतका जमाव का होता त्या ठिकाणी?
हे सर्व माहिती करून घेण्यासाठी आता आपण माझ्याबरोबर थोडं मागे म्हणजे भूतकाळात जाऊया.
मी संगिता बोलतेय, संगिता पतंगे... आदितीची आई हो!
आदिती कोण? अहो सर्व सांगते. अगदी तिच्या लहानपणासून सुरुवात करते.

२-३ वर्षांची असताना आदितीला आरश्याबद्दल आकर्षण वाटतं असे. ती सतत आरश्यात उभी राहून हावभाव बदलत तिचा बराचसा वेळ घालवू लागली. तिचा खेळ हा आरश्यापासून सुरू झाला. तिची शाळेतील आणि कॉलेज मधील अभ्यासातील प्रगती चांगलीच होती. त्याचबरोबर तिला नृत्याची देखील आवड होती. बालपणातील आदिती ही कधी मोठी झाली हे मला कळले देखील नाही. माझी आदिती आता सुंदर परीसारखी दिसतं होती. अगदी दृष्ट लागण्याजोगी.

आदितीला इंजिनिअरिंग साठी US ला जायचे आहे हे जेंव्हा तिने स्वपरिवारात सांगितले तेंव्हा परिवारातील लोकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. US ला जाणारे सर्व Masters ला जातात, तिला तशा चौकटीतील गोष्टी न करता bachelor (undergrad) करायचं होतं, तेव्हा ती अवघ्या १७ वर्षांचीच होती. तिचा तो ठामपणा आणि निग्रही मत मला भावले होते. मी तिला थोडा विचार करून तिच्या निर्णयाला पाठिंबा दिला. तिचा निर्णय खूप मोठा होता, घर रिकामं होणार होते कारण ती आमची एकुलती एक कन्या. पण तिच्या भावी करिअरच्या इच्छेचा विचार करून मी तिला BS करायला पाठवायचे ठरवले. आदिती US मधे गेली. कॉलेज सुरू झाले आणि आदितीचे सुद्धा नवीन रूटीन सुरू झाले.

आयुष्यात एकटे रहात असताना ते देखिल दुसऱ्या देशात, काही चांगले वाईट अनुभव येत असतात, त्यांना सामोरे जाऊन कठीण परिश्रम व निष्ठेने तिने Bachelor in Computer Engineering (with honors) ही डिग्री मिळवली. Graduation होत असतानाच तिला मायक्रोसॉफ्ट ह्या नामांकित कंपनीत Software Engineer ची नोकरी मिळाली.

जसा सूर्य हा रोज उगवतो तसंच आपण आपल्या आशा देखील रोज पल्लवित ठेवल्या पाहिजेत. नकारात्मक विचारांनी आयुष्य जगता येत नाही. मनाला उभारी देण्यासाठी सकारात्मक विचारांची जोड द्यावी लागते. हाच काय तो आयुष्यातील बऱ्यावाईट किंवा कठीण प्रसंगातून जाण्यासाठीचा मूलमंत्र.

करोना काळात Work from Home असताना तिने Miss India Washington contest बद्दल FB वर जाहिरात बघितली. तो रेजिस्ट्रेशन चा शेवटचा दिवस आणि अगदी शेवटचे दोन तासचं काय ते उरले होते. तिने जराही वेळ न दडवता मला फोन करून मी भाग घेऊ का विचारले (त्यावेळेस भारतात पहाटेचे ४, ४:३० वाजले). अगदी मोजक्याच मिनिटात आम्ही दोघींनी निर्णय घेऊन तिने रेजिस्ट्रेशन केले आणि "Pageant" या क्षेत्रात पदार्पण केले. आदितीने स्वतःचे करिअर आणि नोकरी सांभाळून अगदी आगळयाच क्षेत्रात पदार्पण केले होते. अशा ठिकाणी जिथे आमचा परिवार व ओळखीचे कोणीही आजपर्यंत या क्षेत्रात नव्हते.

तुम्हाला म्हणून सांगते, तो क्षण माझ्या डोळ्यासमोर आज ही तरळत आहे. अगदी काल घडलेल्या प्रसंगासारखा.

सिअ‍ॅटल् शहरात Hyatt Regency हॉल मधल्या स्टेजवर "Miss India" Washington ची ही ती स्पर्धा. या परीक्षेसाठी स्पर्धक म्हणून २२ मुली उभ्या होत्या. स्पर्धा उत्कंठावर्धक होत होती. एकामागून एक असे स्पर्धक येत होते. काही स्पर्धेतून बाद झाले होते. आता निवेदक ह्या सौंदर्य स्पर्धेतील अंतिम विजेत्यांचे नाव जाहीर करणार होते. स्पर्धकांचे त्याच बरोबर प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके देखील वाढत होते, उत्सुकता शिगेला पोहोचली होती. त्या प्रेक्षकांत मी देखील उत्सुकता ताणून बसलेली होते. निवेदकाने घेतलेला क्षणभर pause छातीची धडधड वाढवत होता. राहिला होता तो अंतिम क्षण निकालाचा. क्षणभर शांतता, त्या शांततेत प्रत्येकाच्या हृदयाच्या ठोक्यांचा आवाज ऐकू येत होता असे म्हटले तरी अतिशयोक्ती नव्हती. त्या शांततेला चिरत निवेदक बोलत होता.

And ...the ...winner of Miss India Washington is... **"आदिती पतंगे"**, जेंव्हा हे उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले तो अत्यानंद माझ्या डोळ्यातून नकळतपणे ओसंडून वाहत होता. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. माझ्यासाठी आकाश ठेंगणे झाले होते. सर्व हॉल मधील प्रेक्षक टाळ्यांच्या कडकडाटात आदितीच्या Miss India Washington ह्या खास उपाधीला अभिवादन करत होते. तिचे अभिनंदन करत होते.

किती कष्ट घ्यावे लागले होते तिला ही गोष्ट साध्य करण्यासाठी! मेकपपासून ड्रेस डिझायनरपर्यंत आख्खी फौज तयार करावी लागली होती. इतक्या स्पर्धकांमधून आदितीच्या एकटीची निवड होणं ही सोपी गोष्ट नव्हती. ही स्पर्धा केवळ सौंदर्याची नसते तर त्यात बुद्धिमत्ता, प्रगल्भता, तुमचा हजरजबाबीपणा, तुमचे आचार विचार इत्यादींचा विचार करून त्यातून सर्व पंचांचे एकमत होऊन अंतिम निवड करायची असते.

आदितीने आपली एक प्रतिमा उभी केली त्याचा आनंद आणि कौतुक तर आहेच आणि एक आई म्हणून मला खूप अभिमानास्पद वाटते. आज तिच्यामुळे 'Miss India Washington आई' हे नवीन title मला मिळाले. आदितीच्या या आतापर्यंतच्या श्रमिक प्रवासाबद्दल मला सांगताना खूप आनंद झाला. मी माझ्या भावना व्यक्त केल्या. प्रत्येक पालकांना मला फक्त एक सांगावेसे वाटते आपली चप्पल मुलांच्या पायात यायला लागली की आपण जनरेशन गॅप विसरून त्यांचे चांगले मित्र-मैत्रिण होऊन त्यांना समजून घ्यावे, त्यांना आपण वेळ द्यावा, ते काय म्हणतात ते "कानसेन" होऊन ऐकावं,

वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन द्यावं, वेळ पडल्यास योग्य भाषेत समजही द्यावी. त्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना पाठींबा द्यावा. नक्कीच ते त्यांचे ध्येय साध्य करतील.

आदितीला मिळालेली ही नवीन उपलब्धी (achievement) ही तीची महत्वाकांक्षा आणि तिच्या कठीण परिश्रमातून साध्य झाली आहे. तिच्या पुढील आयुष्यासाठी तिला समजून घेणारा, सुस्वाभावी, तिच्या विचारांना प्राधान्य देणारा योग्य साथीदार मिळावा हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

**- संगिता प्रवीण पतंगे**








## हास्यकट्टा

मुलगा: बाबा, कॉलेज च्या Annual Day च्या नाटकासाठी माझी एका भूमिकेसाठी निवड झाली.

वडील: कोणती भूमिका आहे तुझी?

मुलगा: नवरा

वडील: वेडा आहेस का? संवाद असलेली भूमिका माग.

**संकलन- अमित डोईफोडे**


TRAVEL EXPERTS INC
UNBEATABLE LOW PRICE GUARANTEE!
QUALITY FLIGHT!
Our flight services are proven to be the best than any other travel agency!
HOSPITALITY!
Our hospitality services are the best and still updated to this day to strive for perfection!
BEST TOUR PACKAGES!
• Vacation Travel
• Beach Holidays
• Wild Life & Safari
• Adventure Tourism
• Cruise Tourism
"Your Journey, Our Passion."
Travel Experts
And Tours Inc.
BOOK NOW
Contact us for more information
+1 425-368-2462
Info@amoltravel.com
Travel.experts@comcast.net
Visit Us at
www.amoltravel.com
USA | INDIA

# परदेश-गमन

भारतातून पहिल्या वेळी निघालो ती रात्र/पहाट ४ सप्टेंबर १९७० अजुनही अगदी स्पष्टपणे आठवते. एअर-ईंडीयाचे विमान मुंबईच्या सांताकृझ एअरपोर्टहुन ४ सप्टेंबरच्या पहाटे सुमारे १ वाजता निघणार होते. त्या दिवशी गणेश चतुर्थी होती. "श्री ओम गणेशाय नम:" म्हणुन देवाला व वडील मंडळींना नमस्कार करुन वांद्रा येथुन निघालो.

तेव्हा जोराचा पाऊस पडत होता. टॅक्सी थांबवुन बसेपर्यंत थोडेसे भिजायलाच झाले. अंगात आधीच थोडा ताप होता. विदेशगमन, पहिलाच विमानप्रवास म्हणून कोणीतरी सांगितल्याप्रमाणे सूट-टाय घातले होते. आता विचार केला तर त्याचे हसू येते. एअरपोर्टला सोडायला आई-वडील (बडोद्याहून) व मोठा भाऊ होते. धाकटा भाऊ मॅट्रीकच्या अभ्यासामुळे येऊ शकला नाही. त्या दिवसांत टीव्ही, कॉम्प्युटर, ईंटरनेट, सेल-फोन या सुविधा नव्हत्या, त्यामुळे बऱ्याचशा गोष्टींची (विशेषतः विमान-प्रवास, अमेरिकेतील राहणीकरणी, पद्धती वगेरे) माहिती नव्हती. खरं तर, माझ्या बाबतीत परदेश-गमन अगदी अनपेक्षित होतं (पण ती वेगळीच गोष्ट आहे, पुन्हा कधी तरी..) म्हणून तशी माहिती मिळवण्याचा विशेष प्रयत्नही केला नव्हता.

सांताक्रुझ विमानतळावर Air-India (Flight AI # १०१, Boeing ७०७) साठी बॅगेज चेक-ईन, Security Clearance वगेरे झाले. मग बोर्डिंगसाठी विमानापर्यंत चालत जायचे तसे गेलो व विमानांत बसलो. Flight Itinerary प्रमाणे हेच विमान Beirut-Prague-Paris-London-NewYork असे 'मालगाडी' सारखे थांबत थांबत जाणार होते. विमानाने runway वर जायला सुरुवात केली तेव्हां आता आपण आपले कुटुंबीय व मित्रमंडळी सोडून लांब परदेशात चाललो व परत काही वर्षांत तरी त्यांना बघू /भेटू शकणार नाही याची तीव्र जाणीव झाली.

विमान न्युयॉर्कला (JFK International Airport) आले तेव्हा तिथे सप्टेंबर ४, दुपारचे सुमारे ५ वाजले होते. म्हणजे मुंबईहून निघून २५ तास झाले होते. त्या वेळेला Jet-lag म्हणजे काय याची अजिबात कल्पना नव्हती पण एकंदर त्याचाच परिणाम जाणवत असणार. अमेरिकेत खूप थंडी असते असे कोणीतरी सांगितले होते. पण न्यूयॉर्कला विमानातून बाहेर आलो तेव्हा हवामान गरम व दमट होते. त्यात सुट-टाय असल्यामुळे आणखीन अस्वस्थ वाटत होते. एअर-इंडियाला "धन्यवाद" म्हणुन इतर प्रवाशांबरोबर 'Immigration & Customs' च्या दिशेत चालायला लागलो. हातात carry-on व तेव्हाच्या नियमानुसार Immigration Officer च्या पाहणीसाठी एका बंद envelope मधे Lab/X-ray रिपोर्ट होते. तिथे पासपोर्ट तपासणी व कांही प्रश्नोत्तरानंतर, 'Baggage-Claim' च्या दिशेत गेलो. भारतांत चेक-ईन केलेली बॅग न्यूयॉर्कला बॅगेज-क्लेम मधे दिसल्यावर हायसे वाटले, कारण त्यांत परदेशी जाणाऱ्या विद्यार्थीसाठी उपयोगी असे माझे 'सर्वस्व' (नियमानुसार ४० पाऊंड वजनात मावेल इतकेच) भरले होते. त्यातच अभ्यासात उपयोगी होतील (अमेरिकेत घेतली तर डॉलर्स वापरले जाऊ नयेत) अशा विचाराने घेतलेली मोजकीच पण महत्वाची पुस्तकंही होती. Custom's Clearance च्या तिथे ऑफिसरने कांही प्रश्न विचारले व बॅग उघडायला सांगितली. बॅगेत आईनी काळजीपूर्वक ठेवलेल्या वस्तूंची त्यानी वासकावाकस केली. ऑफिसरने त्यातून मीर-पुड असलेली लहानशी प्लॅस्टीकची पुडी उचलून विचारले, "What is this?". माझे उत्तर बहुतेक समजले नसावे की काय पण बऱ्याच शंकेने ऑफिसरनी ती पुडी उघडून जोरानी वास घेतला व अर्थात खूप शिंकायला लागला. त्याचा चेहरा लालबुंद झाला व आता तो काय म्हणेल म्हणुन मी घाबरलो. पण ऑफिसरने नाक साफ करत, घसा खाकरत त्यानी वाकसलेली बॅग मला आवरायला सांगितले व हातानेच खुणवत मला पुढे जायला सांगितले. मी निमुटपणे तिथून निघालो. Customs मधून बाहेर निघायला मोठे दार (Sliding glass door) होते. समोर लोकांचा मोठा थवा जमलेला दिसत होता. ते लोक त्यांच्या नातेवाईकांना वा मित्रमंडळींना न्यायला आले होते. तेव्हां एकदम प्रकर्षाने जाणीव झाली की समोर असलेल्या थव्यात आपले मार्गदर्शन करायला कोणीच नाहीत व आपण आपले प्रेमळ कुटुंबीय, मित्रमंडळी व स्वदेश सोडून किती लांब आलो आहोत. त्या क्षणी परदेशी येण्याचा उत्साह साफ ओसरला. पोटात पोकळी निर्माण झाली. आवंढा गिळुन,

उसना धीटपणा पांघरुन आता पुढची फ्लाईट गाठायला Internal Airport (LaGuardia) ला जायला Shuttle Bus साठी थांबलो.

बस-ड्रायवरला विचारुन 'American Airlines' टर्मीनल स्टॉपला, एका हातात मोठी बॅग व खांद्यावर कॅरि-ऑन सांभाळत उतरलो. American Airlines (AA)च्या काउंटरला कोणीच स्टाफ नव्हता. बाजूला United Airlines च्या स्टाफला विचारल्यावर समजले की 'AA' स्ट्राईकवर आहे. मुंबईहुन निघायच्या आधी Air India (AI) ला याची कल्पना असावी पण त्यांनी तसे कांहीच सांगितले नव्हते. आता काय करायचे हा मोठा प्रश्न ऊद्भवला. 'UA' नी सुचविले की 'AI'च्या काऊंटरला जाऊन त्यांनी 'AA'च्या ऎवजी 'UA'ची फ्लाईट बदलण्याची परवानगी दिली तर तुम्हाला 'UA'वर reschedule करुन देऊ व म्हणाले की 'AI'चे काऊंटर JFK टर्मीनलला आहे तिथे जावे लागेल. आधी इतक्या लांबच्या त्रासिक प्रवासाने जाम दमलो होतो व आता आपली ही 'सत्व परीक्षा' होत आहे असे वाटले.

परत 'JFK'ला जायला Shuttle-Bus (नशीबाने फुकट होती) घेऊन 'AI'चे काऊंटर शोधले. तिथे चिटपाखरु पण नव्हते. 'AI'चा स्टाफ ड्युटी संपल्यामुळे निघून गेला होता. परत 'Shuttle Bus'नी प्रदक्षिणा करुन 'UA'च्या काऊंटरकडे गेलो. तिकडच्या ऑफिसरला एकंदर कथा सांगितली व 'UA'ची (NY to Rapid City) कनेक्टिन्ग फ्लाईट द्या अशी विनंती केली. ईश्वरकृपेने तो ऑफिसर चांगला मदतशीर निघाला व म्हणाला की 'UA'ची फ्लाईट देऊ शकतो पण उद्या (सप्टेंबर ५) पहाटे ६ वाजताची आहे, चालेल का? अर्थात माझ्याकडे दुसरा पर्यायही नव्हता. त्याने 'NY-Albany-शिकागो-Minneapolis-Rapid City' (म्हणजे परत मालगाडीचा प्रवास, पण काय करणार?) असे तिकीट दिले साफ दमलो होतो. पोटांत कावळे पण केव्हापासुन कोकलत होते.

दुसऱ्या दिवशीच्या (सप्टेंबर ५) पहाटेची वाट पाहत एका बेंचवर बसलो व आजुबाजुच्या रिफ्रेशमेंट स्टॉल्सकडे नजर गेली. वेगवेगळ्या पदार्थांच्या किमती साफ दिसत होत्या. डोक्यांत $/Rs चे गणित सुरु झाले. खिशात फक्त ८ डॉलर्स (भारतातून निघताना तेवढेच रोख फॉरेन एक्सचेंज तेव्हा परदेशगमन प्रवासा साठी मिळायचे) होते. डॉलर्स नंतर ऊपयोगी येतील म्हणून मन आवरले व काहीच खाणेपिणे न घेता, एक हात घट्ट मोठ्या बॅगेच्या हॅन्डलला धरुन व डोके कॅरि-ऑनवर टेकून डोळे अर्धवट उघड-बंद करत झोपाळू पहारेकऱ्यासारखा पहाटेची वाट बघत पेंगत होतो. पहाटे 'UA'च्या फ्लाईटवर चहा-ब्रेकफास्ट घेतल्यावर पोट जरा शांत झाले.

UAच्या 'NY-Albany-Chicago' फ्लाईट नंतर Minneapolis साठी विमान बदलायचे होते. Minneapolis Airport वर आठवले की Rapid City ला 'International Students Association' तर्फे कोणीतरी काल (सप्टेंबर ४) Rapid City Airport वर मला न्यायला येणार होते, त्यांना फोन करुन कळविले पाहिजे की मी कालच्या ऎवजी आज (सप्टेंबर ५) दुपारी सुमारे २ वाजता पोहोचणार. Minneapolis Airport ला एकानी Pay-Phone वर फोन कसा लावायचा व टेलिफोन-ऑपरेटरनी विचारल्या नंतर 'Collect-Call' (फोन रीसिव्ह करणारी व्यक्ती चार्ज Accept करणार असेल तर) कसा करायचा ते दाखवले. नशीबाने तो प्रयत्न यशस्वी झाला. मग अर्थात, हे वर वर्णिलेले पुराण भारतांत बडोद्याला (मी अमेरिकेत Rapid City ला ३२ ऐवजी ४८ तासांनंतर पण 'सुखरुप' पोहोचलो या बातमीची काळजीपूर्वक वाट पाहत असणाऱ्या) आई-वडिलांना लौकरात लौकर कसे कळवता येईल, हा विचार करत 'Minneapolis to Rapid City' ला जाणाऱ्या विमानात बसलो व आयुष्याच्या पुढच्या प्रवासाची सुरुवात केली...

**- सुधीर सदानंद अवसरे**, SMM Founder

# अधांतरी, एक सत्य

मी जेव्हा अमेरिकेमध्ये पहिल्यांदा आलो त्याच महिन्यात माझा वाढदिवस होता. भारतामध्ये माझा खूप मोठा मित्रपरिवार होता. मी सर्वांमध्ये मिळून मिसळून असायचो. खूप धमाल करायचो. पण इथे सुरवातीला फारशी कोणाशी ओळख नव्हती. वाढदिवस साजरा करायला जवळचे कोणीच नव्हते. माझा माझाच केक आणून मी कापला. खूप एकटेपणा जाणवत होता. घरची खूप आठवण येत होती. 'अधांतरी' ही कविता कोणी लिहिली माहीत नाही पण ही कविता म्हणजे माझ्या त्यावेळच्या मन:स्थितीचे यथोचित वर्णन करणारी आहे. त्या वाढदिवसाच्या दिवशी माझीही अवस्था अगदी 'सेम टू सेम' तशीच होती. आपल्याला अगदी हेच म्हणायचं असतं पण भावना इतक्या अनावर झालेल्या असतात की व्यक्त करायला शब्द ही सापडत नाहीत, असंच काहीसं त्यावेळेस झालं होतं. माझ्या भावना व्यक्त करायला ह्या कवितेची खूप मदत झाली. त्यामुळेच ही कविता माझ्या मनात घर करून राहिली आहे. व्हिसा मिळाल्यावर उडालेली धावपळ; घरच्यांना, शाळा कॉलेजातील मित्रांना सोडून इतक्या लांब येताना मनात उठलेलं विचारांचं काहूर; स्वकर्तृत्वावर परदेशी जाऊन आपली स्वप्नं साकारण्याचा आनंद तर आपला देश सोडताना काहीतरी खूप, जवळचं गमावल्याचं दुःख अशी मनाची द्विधा अवस्था; अगदी हेच सगळं ह्या कवितेत तंतोतंत उतरलं आहे. म्हणूनच माझ्या आठवणींशी संबंधीत असे थोडेसे बदल करून मला ही कविता सगळ्यांबरोबर शेअर करावीशी वाटली. कदाचित तुमचीही अवस्था कधीतरी अशीच झाली असेल!
(**खालील कविता लिहिणाऱ्या त्या अज्ञात कवीचे खूप आभार**)

Visa stamping झाल्यावर एकच धावपळ उडाली..
जे स्वप्न पाहिलं होतं ते वास्तवात येताच
उगीचच भीती वाटली.
भेटी-गाठी झाल्या, खरेदी झाली,
सत्कार झाले, बॅग ही भरली.
ही सगळी गडबड लग्नाच्या ही वर झाली.

घरातून पाय काढायच्या वेळी लक्षात आलं,
आज्जीशी थोडं बोलायचं राहूनच गेलं.
स्वप्नांची दुनिया बाहेर होती,
आपुलकीची छाया घरातच होती.
काहीतरी मिळवण्यासाठी हे एवढं सारं सोडायचं?
आता या समोरच्या अंगणात आम्ही कधी खेळायचं?
आज अश्रूंचं वजन स्वप्नाहून ही जास्त झालेय...
नकोच ही America असं हजारदा वाटून गेलं.

विमानतळावर मित्रमंडळींची गर्दी झाली होती,
कधी नव्हे ते अंगाऱ्याची पुडी मी खिशात ठेवली होती.
हसत होतो, बोलत होतो, सगळ्यांचा निरोप घेत होतो,
विमानतळावरच्या झगमगाटात मी एकटा पडलो होतो.
पाठ फिरवण्याची वेळ झाली.

बाबांची पापणी हलकीच गलबलली,
बरंच काही बोलून गेली.
सातासमुद्राकडे निघालायस,
समृद्धीच्या राज्यात निघालायस,
यशाच्या शिखरावर चढताना
इकडची काळजी करू नकोस,
पण रोज Phone करायला विसरू नकोस.
एका डोळ्यात कौतुक आहे,
दुसऱ्या डोळ्यात काळजी
तुझी आठवण खूप येईल रे दिवाळीच्या सकाळी,
व्यावसायिकतेच्या दुनियेत मनातला ओलावा ही जप,
जसा आहेस जाताना तसा परत येतानाही अस,
पाश्चात्य संस्कृतीत जरी झालास दंग, तोल नको सोडू.
विमानात मिळेलच सर्व, पण डाव्या बाजूच्या कोपऱ्यात
लाडू ठेवलेत बांधून, ते नको विसरू.

मित्र विचारतात मी काय miss करतो?
कसं सांगू मी काय miss करतो?
शाळेत फायनलला पहिल्या बॉलवर आउट झालो होतो.
गणपतीच्या मांडवात मुद्दाम भांडलो होतो.
फायनल इयरच्या पार्टीत रंगलो होतो,

मित्रांसोबत कट्ट्यावर गप्पा मारत होतो,
पावसाळ्यात बाईकवर ट्रीपला जात होतो,
रात्री स्टेशनवर चहा क्रिमरोल खायचो,
आईच्या हातचं कधी काळी मनसोक्त जेवलो होतो.
कसं सांगू मी काय miss करतो?

इथली सुसंस्कृत संपन्नता पाहून तोंडात बोटं जातात,
मात्र समृद्धीच्या देशातले लोकही समाधानच शोधतात.
म्हणून वाटतं देऊन टाकावेत जिंकलेले सारे किल्ले,
राहावं परत आपल्या देशात, मावळ्यांच्या संगतीत,

सारस बागेतली भेळ खावी, नेवाळेंची मिसळ चापावी,
FC Road वर उगीचच इकडून तिकडे चक्कर मारावी,
जगन्नाथांचं पान खाऊन सणसणीत शिवी प्रेमानं द्यावी.
.... त्याची उधारी राहिलीच की द्यायची!

परकं आभाळ शोधण्यासाठी जमीन आम्ही सोडली,
इथूनही आभाळ दिसतंय तेवढंच उंच...
पण आतातर पायाखाली जमीनही नाही राहिली.
झालो आम्ही अधांतरी...

**झालो आम्ही अधांतरी...!**

**कवितेचा स्रोत: आंतरजाल**

**मनोगत - विनय पवार**

# वैभव भाषेचे - रंगशब्द

आपल्या मराठी भाषेमध्ये रंगछटांची कितीतरी सुंदर नावे आहेत जी हल्ली आपण वापरतच नाही. रंगछटांचे वर्णन करण्यासाठी आपण सहज इंग्लिश रंगांची नावे वापरतो. मराठी मध्ये इंग्लिश इतकी नावे नसली तरी जी काही नावे आहेत ती विस्मरणात जाऊ द्यायची नसतील तर आपण ती आवर्जून वापरायला हवीत.
ह्या शब्दसंपत्तीचा संग्रह करून त्या नावांना उजाळा देण्याचा हेतू.
मुख्य रंग (त्यांचे पर्यायवाची शब्द )आणि रंगछटा, आणि रंगछटांचे वर्णन करणारे काही शब्द (नाव नसलेल्या रंगांचं वर्णन करण्यासाठी गडद, जर्द, हलका, फिका, फिकट, भुरकट, मळकट हे शब्द आहेतच. 😊)

* लाल, तांबूस, तांबडा, जास्वंदी, डाळिंबी, कुसुंबी, किरमिजी (maroon), लालचुटुक, लालसर, लालेलाल, लालभडक, रक्तवर्णी,
* तपकिरी (brown), गव्हाळी, विटकरी, गेरू, बदामी (light brownish yellow),
* गुलाबी, गुलाली, गुलबक्षी, राणी,
* जांभळा, वांगी, अंजिरी, आमसुली, कोनफळी,
* केशरी, भगवा, नारिंगी, शेंदरी, अबोली,
* पिवळा, हळदी, लिंबू, केतकी, जिलेबी, सोनेरी, पिवळाजर्द, पिवळट, पिवळसर, पिवळाधम्मक
* हिरवा, पोपटी, रामा, मेंदी, शेवाळी, लिंबोळी, पिस्ता, चटणी, हिरवागार, हिरवट,
* निळा, मोरपंखी/ मोरपिशी, आकाशी, चिंतामणी, निळसर, निळेशार, निळाभोर, निळाजर्द
* खाकी, मातकट
* करडा, राखाडी, पारवा
* काळा (काळाकुट्ट, काळाशार, काळेभोर, काळपट, काळसर), बुक्का /अबिरी, करवंदी, शिसवी,
* पांढरा/सफेद, दुधिया/ दुधी, मोती/मोतिया, श्रीखंडी, रुपेरी/चंदेरी/ चांदी, हस्तिदंती, पांढराशुभ्र, पांढराधोप, पांढराफेक, पांढरट

# बालविभाग

## चांदोबा



चांदोबा चांदोबा तू आहेस तरी केवढा?
कधी दिसतोस छोटा तर कधी होतोस मोठा
नाजूक-साजूक कोर, तर कधी चेंडू सारखा गोल
सांगशील का गुपित तुझे, जरा माझ्याशी बोल

आईची नजर चुकवून खातोस का पोळी अन तूप?
म्हणूनच गोलमटोल दिसते तुझे हे रूप
तुपात पडता माशी,  राहतोस मग तू उपाशी
खात नाहीस पोटभर मग होतोस कोर छोटीशी

रात्रीचा दिसतोस, मग सकाळी जातोस कुठे?
सूर्य तुझा दादा, त्याची भीती का वाटे?
चांदण्यांशी खेळतोस लपाछपीचा खेळ
ढगाआड लपून राहतोस केवढा तरी वेळ!

खेळता खेळता पडलास का? कसे आले हे डाग ?
गोऱ्या तुझ्या अंगावरती, जरा.. मला सांग
आकाशी खेळताना जर पडलास खाली धपकन
हातांच्या ओंजळीत झेलेन तुला पटकन!

## गुलाबकळी



मंद वाऱ्याच्या झुळकी वरती
गुलाबकळीने घेतली गिरकी .
अल्लड वाऱ्याने फुंकर घातली.
गुलाबाची कळी खुद्‌कन हसली.

सोनेरी किरणांत न्हाऊन निघाली.
पाकळी पाकळी उमलू लागली.
थेंबांचे मोती पाकळ्यांवर सजले.
गुलाबाचे फूल डोलू लागले .

दरवळला सुगंध रानीवनी
फुलपाखरे गाती गाणी.
लोभस गोंडस गुलाबाचे फूल.
मोनाराणीला लागले खूळ.

गुलाब फुलांनी ओंजळ भरली.
गुलाबी स्वप्नं डोळ्यांत दिसली.



एक दोन तीन चार, गणपतीचा जयजयकार!
पाच सहा सात आठ, मिरवणूकीचा मोठा थाट!
नऊ दहा अकरा बारा, गणपती आले आमच्या घरा.
तेरा चौदा पंधरा सोळा, गणपतीचा मोठा सोहळा!
सतरा अठरा एकोणीस वीस, नमन माझे गणपतीस!



**- अश्विनी क्षीरसागर**

# माझी लेझीम

मेघना मावशीच्या पहिल्या लेझीम क्लास ला मला खूप मजा आली. पण घरी प्रॅक्टिस करण्यासाठी माझ्याकडे लेझीम नव्हती. मग मला एक युक्ती सुचली. **DIY लेझीम !!**



घरी मला एक संपलेल्या किचन टॉवेलच्या आतला पुठ्ठयाचा रोल सापडला. तो मी दुसऱ्या छोट्या पुठ्ठयाच्या रोलला सुतळीने जोडला. हे झाले माझ्या लेझीमचे २ मुख्य भाग. एका हातात मोठी बाजू आणि दुसऱ्या हातात लहान बाजू. पण ह्या लेझीम मधून आवाज येत नव्हता. खऱ्या लेझीम ला तर आवाजासाठी metal plates जोडलेल्या असतात. मग मी अजून एक छोटा पुठ्ठयाचा रोल घेतला आणि त्याचे गोल गोल तुकडे कापले. ते मी सुतळीला चिकटपट्टीने जोडले. आवाज यावा यासाठी छोटे छोटे लाकडी मणी त्याला आतून जोडले. आता माझी लेझीम अगदी खऱ्याखुऱ्या लेझीम सारखी दिसायला लागली आणि त्यातून थोडा आवाजही यायला लागला. नंतर मी माझी लेझीम थोडी रंगवली. आता ही लेझीम घेऊन मी घरी प्रॅक्टिस करते. मला माझी लेझीम खूपच आवडते.

आता सिअॅटल् महाराष्ट्र मंडळाच्या गणपती मिरवणुकीमध्ये आम्ही लहान मुले लेझीम घेऊन वाजत गाजत गणपती बाप्पाचं स्वागत करणार.

**- ओवी केळकर** Grade-2

# भांडण

एकदा काय झालं? एकदा काय झालं?
करंजी, कडबू, कानोल्यात भांडण लागलं.
करंजी मुरडत म्हणाली, मी बाई नाजूक-साजूक
कडबू म्हणाला, मी केवढा तरी मोठा ढब्बू
कानोला म्हणे, अरे माझा आकार तर बघा -
कानाच्या आकाराचा मोठ्ठा, म्हणून मी कानोला.
कडबू म्हणे, माझ्यात काय? पुरण गोडगोड.
आणि त्यात आणखी काय? माहीत हाय !
बदाम आणि बेदाणे अन् खडीसाखर गोड गोड
कानोला म्हणे, माझ्यात तर हे सगळे असतेच असते
शिवाय माझा कानासारखा आकार!!
त्यावर तर भाळतात सगळे! आकाराने मीच मोठ्ठा
मुले खातात मला पुरवून पुरवून
करंजीचा दिमाख फक्त दिवाळीतच,
फार फार तर गणेशाच्या नैवेद्यातच
कानोला मात्र लागतो पुरणावरणाच्या स्वयंपाकात,
देतात मला मोठा मान
देवीच्या नवरात्रात तर मी लागतोच; पोळा आणि बेंदूर,
नागरपंचमीत, तर मी दिंडांबरोबर असतोच...
आणखीन सुद्धा चालले असते हे भांडण,
तेवढ्यात आली तिकडून मुले धावत.
सगळ्यांनी टाकले करंजी कानोला आणि कडबू ला
बघता बघता मटकावून!

**- विनायक अग्निहोत्री**

# At The Fair

At the fair I see a sea of people chatting,
walking, from game to game till evening,
When the fair closes the sea of people
goes home.
Tired, sleepy.
Leaving the fair sad, alone
Waiting for people as if on a deserted
island

**- Sourish Panda, Age – 9 years**

# Untitled Allegory

There was once a huge forest, teeming with life. A kingdom was built adjacent to the forest and was expanding the territory inside the forest. The animals didn't mind it at first, since only a small part was being taken, but that small piece turned into acres, which turned into townships. On top of this, the king was hunting defenseless animals for fun every day when the architects were working.

"Such miserable creatures. They can't fight because they will surely lose to us, superior human beings. Such a shame, such a shame indeed." The inhabitants of the forest were infuriated at the conducing actions of the unruly king, but they didn't want to fight the king yet, they would first see if there was a diplomatic solution to the problem. The government of the forest sent animal diplomats to come to a solution that didn't involve the kingdom expanding into their territory. They went to reason with the king, but the king rudely declined.

"How dare you filthy creatures talk with the great and powerful emperor! I have better things to do than to converse with you! Begone from my palace at once!" The animals came back to the forest, seemingly defeated. They knew what they had to do now; since no diplomatic solution could be reached, they would now go to war.

The news spread to the kingdom, all the way to the king, and he said: "What harm can such animals do to my vast and glorious empire? They will kill themselves, if not by my soldiers' blades." The king laughed. He threw parties and didn't take this situation seriously. The animals on the other hand made stone weapons and sharpened their tactics. The monkeys can swing from branch to branch, all the way to the back of the palace. The elephants can charge through the castle's gates, acting as brute force. The birds can provide air support and drop light, sharp objects from the sky. The lions were the leaders who led each faction. They plotted every possible outcome, calculated their movements, and when the day of battle came, the animals were fully prepared. The elephants charged the castle doors, the monkeys swung into the castle windows, the birds stun the king's soldiers by dropping heavy loads, and the lions lead each team into battle. The animals easily defeated the soldiers, since the king had spent no time preparing his soldiers for battle. The animals made their way to the throne room, where the emperor was cowering underneath a table. The animals decided to have mercy, and instead of killing him, they put him in jail for the rest of his life. The animals rejoiced, and so did the kingdom, as the reign of the overconfident king was over, and everybody lived prosperously once more.

**- Shrihan Patil (SMM Yuva)**

# Captured

**कृती:** एका भांड्यात तेल गरम करून घयावे. तेल थोडेसे जास्त घ्यावे. मोहरी घालावी, मोहरी तडतडली की इतर फोडणीचे साहित्य घालावे. मग चिरलेला कांदा घालून चांगला परतावा. त्यात कणिक घालून छान खमंग वास येईपर्यंत भाजावी. एकीकडे पाणी उकळून घ्यावे. भाजून झाल्यावर त्यात तिखट, मीठ, थोडीशी चवीपुरती साखर घालून उकळलेले पाणी थोडे थोडे घालावे. पाणी जास्त लागत नाही. चांगले हलवून घावे, गुठळी होऊ देऊ नये. भांड्यावर झाकण ठेवून चांगली वाफ  ढावी. दणकून वाफ आल्यावर खाली कढई घेऊन त्यात लिंबू पिळून, बारीक चिरलेली कोथींबीर घालून खाण्यास द्यावे.

## मेथीचे थालीपीठ

**साहित्य:** ५ वाट्या ज्वारीचे पीठ, १ जुडी मेथी, २ चमचे तिखट ,१ चमचा मीठ (किंवा चवीनुसार), १ चमचा हळद, १/२ चमचा हिंग, ६-७ पाकळ्या लसूण, कोथिंबीर, तेल, पाणी

**कृती:** परातीत पीठ घेऊन त्यात चवीनुसार तिखट, मीठ, हिंग, हळद, लसूण ठेचून कोथिंबीर व मेथी बारीक चिरून घालावी. थोडे थोडे पाणी घालून सैलसर गोळा मळावा. तव्याला तेल लावून थालीपीठ थापावे.  थापताना मध्ये मध्ये पाण्याचा हात लावून थापावे. आता गॅस वर तवा ठेवून त्यावर झाकण ठेवावे. चुर्रर आवाज आला की थालीपीठ उलटवावे. दोन्ही बाजूने गुलाबीसर डाग पडले की तव्यावरून काढावे. गरम-गरमच वाढावे.
दही, लोणी, चटणी बराबर छान लागते.

**दह्यातील चटणी:** दही फेटून घ्यावे. त्यात चवीनुसार तिखट, मीठ, साखर, दाण्याचे कूट ३-४ चमचे घालावे व चांगले ढवळावे.

## तांदुळाच्या उकडीचे थालीपीठ

**साहित्य:** ३ वाट्या तांदूळ पीठ, हळद, हिंग , कोथिंबीर, चवीनुसार मीठ आणि तिखट, १ टेस्पून लोणी, १ टेस्पून तेल, 3 वाट्या किंवा थोडे कमी पाणी

**कृती:** एका भांड्यात प्रथम पाणी उकळून घ्यावे. एक उकळी आली की त्यात तेल, मीठ, लोणी घालावे. त्यात तांदूळ पीठ घालावे. चांगले ढवळावे. गॅस मंदच ठेवावा. भांड्यावर झाकण ठेवावे. १-२ वाफा काढून घ्याव्यात. गॅस बंद करून नंतर परातीत उकडीचा गोळा घेऊन त्यात तिखट, मीठ, कोथिंबीर, हिंग , हळद घालून पाणी लावत मळावे. गोळ्याला तेलाचा हात लावून झाकून ठेवावे. १० मिनिटांनी थालीपीठ थापावे व तव्यावर तेल लावून टाकावे. दोन्ही बाजूने खरपूस भाजावे. तूपाबरोबर गरम -गरम थालीपीठ छान लागते.

**- सौ. अर्चना अ. कुलकर्णी**

# पोताप्पालू

ही माझ्या आजोळची, आजीच्या हातची आवडती गोष्ट आहे. हा पदार्थ थोडक्या साहित्यात आणि झटपट तयार होतो.



**साहित्य:** · १/२ कप गव्हाचे पीठ, १ टेबलस्पून तांदूळ पीठ, · १/३ कप साखर, १ कप पाणी, कापलेले काजू, तूप ळण्यासाठी

**कृती:** एका वाडग्यात गव्हाचे पीठ, तांदूळ पीठ, साखर, काजू एकत्र करणे. पातळ पीठ भीजवणे जेणेकरून पीठ सहज ओतल्या जाईल. झाकून १५-२० मिनिट ठेवणे. तूप गरम करणे आणि वाटीने पीठ त्यात ओतणे. मध्यम आचेवर शिजू देणे. पलटवून गुलाबी रंग येई पर्यंत शिजविणे.

**नोंद:** तुम्ही 1/2 कप पिठात 6-7 पोताप्पालू बनवू शकता. कोपऱ्याचा पोत कुरकुरीत आणि मधला भाग मऊ आहे. · अधिक चवदार बनवण्यासाठी चिमूटभर मीठ घाला. तुम्ही त्यावर चॉकलेट सॉस, आइस्क्रीम सर्व्ह करू शकता.

# खरवस

खरवस हे गाईच्या किंवा म्हशीच्या चिकाच्या दूधापासून बनवलं जातं. चिकाचं दूध म्हणजे बछड्याला जन्म दिल्यानंतर १ किंवा २ दिवसांत तयार होणारे दुधाचे पहिले स्वरूप. पारंपारिक पद्धतीत चिकाचं दूध आणि गूळ किंवा साखर यांचे मिश्रण शिजवून खरवस तयार केले जाते. आम्ही चिकाच्या दुधाशिवाय खरवस बनवण्याचा, पारंपारिक खरवसासमान चव आणि पोत आणण्याचा प्रयत्न करीत आहोत.



**साहित्य:** · दूध 500 मिलि, · साखर 1/4 कप
अगर अगर 1 टेबलस्पून, · वेलची पूड 1 टीस्पून , केशर २-३ चिमूट, पाणी 1/4 कप

**कृती:** 1/4 कप पाण्यात अगर अगर भिजवा. जाड तळाच्या भांड्यात दूध उकळवा. एक उकळी आल्यावर साखर घाला आणि ती विरघळेपर्यंत ढवळा. दूध १/४ने आटेपर्यंत मध्यम आचेवर उकळत रहा. हे मिश्रण सतत ढवळा जेणेकरून दूध भांड्याच्या तळाशी किंवा कडांशी चिकटू नये. आता आच मंद करा. बाजूला अगर अगर आणि पाण्याचे मिश्रण गरम करा आणि ते जिलेटिनस पोतसारखे दिसेपर्यंत किंवा सर्व अगर अगर फ्लेक्स पाण्यात विरघळत नाही तोपर्यंत सतत ढवळत रहा. उकळत्या दुधात अगर अगर घाला आणि ढवळा. मिश्रण एकजीव आणि घट्ट दिसल्यावर डब्यात ओता. त्यावर वेलची पूड आणि केशर शिंपडा. डबा झाकून ठेवा आणि निवू द्या. डबा ३-४ तास फ्रीजमध्ये ठेवा. आता खरवसाची लादी तयार आहे. कापून सर्व्ह करा.

- **Ruchita Wattamwar**

# पुरणाचे दिंड

हा पदार्थ महाराष्ट्रात, विशेषतः नागपंचमीला केला जातो कारण त्यादिवशी उकडीचा नैवेद्य दाखवला जातो.



Photo: Ashwini Kshirsagar

**साहित्य :** सारणासाठी - १/४ (सव्वा ) वाटी हराभरा डाळ, दिड ते दोन वाटी पिवळा गूळ, वेलदोडा पूड, जायफळ, केशर
आवरणासाठी: १/४ (सव्वा ) वाटी कणिक (गव्हाचे पीठ), मीठ, मोहन (कडकडीत गरम केलेले तेल ), पाणी

**कृती:** पुरीसाठी कणिक मळतो तशी घट्ट मळून घ्यावी. मोहन किंचित घालावे, कंसाचेकच्चे तेल घातले तरी चालते.
हराभरा डाळ ५-६ तास भिजवावी. कुकरमध्ये डाळ शिजवून घ्यावी. शिजताना दुप्पट पाणी घालावे. थोडीशी हळद आणि किंचित तेल घालावे. कुकरच्या ५-६ शिट्ट्या करून घ्याव्यात. डाळ शिजल्यावर त्यातील पाणी गाळणीने गाळून घ्यावे. ह्या पाण्याला कट म्हणतात. उरलेल्या पाण्याची कटाची आमटी करता येते. आता कढईमध्ये शिजलेली आणि पाणी काढलेली हरभरा डाळ घालावी. त्यात गूळ घालावा व हे मिश्रण एकजीव होईपर्यंत घोटावे. त्यात वेलदोडा पूड, जायफळ किसून आणि केशर घालावे. दिंडाच्या सारणासाठी पुरण तयार झाले. कणकेचा एक छोटा गोळा घेऊन पुरी लाटावी. त्यात एक चमचा सारण घालावे. करंजीसारखी पुरी दुमडून घ्यावी. किंवा चौकोनी आकारात घडी घालून घ्यावी. अशा सर्व कणकेच्या पुऱ्या सारं भरून तयार ठेवाव्यात. मोदकाप्रमाणे वाफवावीत. पुरणाची दिंडी तयार आहेत. खायच्या वेळेस साजून तूप घालून वाढावीत. अतिशय चविष्ट लागतात.
**नोंद:** दिलेल्या साहित्यात अंदाजे १०-१५ दिंडी होतील. आपण पुरीचा आकार करण्यावर आहे. हरभरा डाळी ऐवजी खोबऱ्याचे सारण घालून पण दिंडी करु शकतो. गूळ आपल्या गोडीनुसार कमी जास्त करावा. डाळ शिजवताना तेल घातले की डाळ उतू जात नाही.

# टिकमिकले

**साहित्य:** ४ हिरव्या मिरच्या, १ टीस्पू जिरे, मोहरी , चिमूटभर हिंग, कोथिंबीर, तेल, मीठ, साखर, दही

**कृती:** मिरचीचे बारीक तुकडे करणे. एका भांड्यात फोडणीसाठी तेल १ चमचा गरम करून त्यात जिरे ,मोहरी, हिंग घालावा. नंतर त्यात मिरचीचे तुकडे टाकून खमंग परतून घ्याव्यात. फोडणी थंड होऊ द्यावी. दह्यामध्ये मीठ, साखर, कोथिंबीर घालून मिरच्या त्यात घालाव्यात व ढवळावे. ह्याला दह्यातल्या मिरच्याही म्हणतात

**- सौ. अमृता दिलीप कुलकर्णी**

**Saraswat cuisine** is the cuisine of Saraswat Brahmins from Kokan region on the west coast of India. Here are a couple of traditional recipes from our kitchen.

## Kakadichi Tavsoli

**Ingredients:** Cucumber 1, Semolina 2 tbsp,
Crushed roasted cumin 1 tsp,
Green chilies crushed 1 tsp,
Cilantro 3 tbsp, Turmeric 1/2 tsp,
Grated ginger 1/2 tsp, Rice flour as needed,
Salt to taste, Oil

Peel and grate the cucumber. Squeeze a little water from it. Apply salt and semolina to the cucumber and keep the mixture aside for 15 mins. Then add the ginger, green chilies, cilantro chopped, turmeric and rice flour as needed, mix well, and make into a soft dough. On a griddle, apply some oil. Keep the dough on the griddle and press it onto a disc shaped using your hands just like you do for thalipeeth.
The dough should spread evenly. Make a hole in the middle of the disc so oil can seep in. Put some oil on the sides.
Cover and cook on medium flame for 2 mins. Then slowly flip it and cook the other side. Apply some ghee to it to enhance the taste. Serve hot with pickles and butter. This can be served for breakfast or an evening snack.

## Surnali

(Traditional Sweet Pancakes)

**Ingredients**: 2 cups rice, 1 tsp methi seeds, 1/2 cup grated coconut, 1 cup soaked pohe, 4 tbsp yogurt, 1/2 tsp turmeric, 3/4 cup grated jaggery, pinch of cardamon powder, salt to taste, ghee

Soak rice and methi for 7 to 8 hours. Make a paste of it along with coconut, soaked pohe and yogurt. Make it into a fine paste. This batter should be of dosa consistency. Then add the grated jaggery to it and turmeric. Mix well and keep it to ferment for at least 8 hours. Before making the Surnalis (pancakes) add cardamon powder to it and mix the batter well. On a warm griddle spread the Surnali batter. Add ghee on the sides. Cover and cook on medium flame till it turn light brown, then flip it and cook the other side. Serve with fresh butter. Kids will love this yummy snack.

**- रमा हेरवाडकर**

जवस जरासे कडवट असतात. त्यामुळे गूळ घालावा. साखरेऐवजी केव्हाही गूळ चांगला. आहारात जवस चांगले आणि मधुमेहींसाठी अतिशय उत्तम

## जवस चटणी

**साहित्य:** १ वाटी जवस, तिखट , मीठ , किंचित गूळ, २ चमचे साधारण सुक्या खोबऱ्याचा किस
**कृती:** जवस कढईत भाजून घ्यावे. सुके खोबरे भाजून घ्यावे. गार झाल्यावर मिक्सर मध्ये भाजलेले जवस, सुके खोबरे , लाल तिखट, मीठ आणि गूळ घालून बारीक करून घ्यावे.
**नोंद:** यात लाल तिखटा ऐवजी कांदा लसूण चटणी घातली तरी छान लागते.

## जवस बडीशेप

**साहित्य:** १ वाटी जवस, मीठ, १ -२ थेंब  तूप

**कृती:** कढईत १ ते २ थेंब तूप घालावे . जवस खमंग भाजावेत. किंचित मीठ घालावे. गार झाल्यावर बरणी मध्ये भरावेत. जेवण झाल्यावर नेहमीच्या बडीशेपमध्ये (१ छोटा चमचा) मिसळून किंवा नुसतेच हे जवस खावेत. मधुमेहींसाठी खूप उपयुक्त.

**- सौ. अमृता दिलीप कुलकर्णी**

# अळिवाचे लाडू



**साहित्य:** १०० ग्रॅम अळीव, ३ नारळ (खोवून घेणे), १ किलो गूळ, वेलची पावडर, नारळ पाणी
**कृती:** नारळाच्या पाण्यात अळीव सकाळी भिजत घाला. २ तासात अळीव चांगले फुलून येतील. गूळ अगदी बारीक चुरून घ्यावा. नंतर गूळ, नारळ चव (खोवलेलं खोबरं) व अळीव एकत्र करून चांगले कालवावे. जाड बुडाच्या पातेल्याच्या तळाला डावभर तूप लावावे. त्यात हे मिश्रण घालून मंद गॅस  वर ठेवावे. मधून मधून हलवावे. अळीव चांगले फुलून आले व मिश्रण घट्ट झाले की पातेले गॅस वरून खाली उतरवावे. मिश्रण थंड झाले की वेलची पूड घालून एकत्र करून घ्यावी आणि मग लाडू वळावेत.
**नोंद:** वेलची पूड नसली तरी चालेल. हे लाडू पौष्टिक आहेत. थंडीच्या दिवसांत उत्तम.

**सौ. मीनाक्षी बिडकर**

## हास्यकट्टा 😆 😆😆

नवरा: आज भाजीत मीठ थोडं जास्त वाटतंय.

बायको: मीठ बरोबर आहे, भाजीच थोडी कमी पडलीये, सांगितलं होतं ना, जास्त आणायला.    **संकलन - विनय पवार**

# ''अजूनही संस्कृती टिकून आहे''

संस्कृती व परंपरा टिकवणे हा आपला धर्म आहे आणि सण व उत्सव साजरे करणे हे आपले कर्तव्य! अर्थात प्रत्येकाच्या धर्म आणि कर्तव्याच्या व्याख्या वेगळ्या असतात. परंतु चुकीच्या गोष्टींचे अनुकरण करण्यापेक्षा आपल्या पूर्वजांनी घालून दिलेल्या काही परंपरांचा आदर केला तर काय हरकत आहे? ''सहा ऋतूंचे सहा सोहळे, प्रत्येकाचे रंग वेगळे'' तसेच हिंदू संस्कृती प्रमाणे आपले सण, उत्सव, व्रत-वैकल्ये याही गोष्टी त्याबरोबर ओघाने आल्याच!

''भारतीय परंपरा आणि आपली संस्कृती ही टिकवली पाहिजे'' असे सर्वचजण सांगतात. पूर्वापार चालत आलेले हे सण त्या त्या ऋतुमानाप्रमाणे साजरे केले जातात. त्यामुळे त्या सणाची आणि व्रताची व्याख्या पुरेपूर पटते. आपल्या सगळ्यांनाच माहितेय की चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन असे बारा मराठी महिने म्हणजे सण, धार्मिक उत्सव, परंपरांपर्यंत पोहचण्याची जणू काही एक शिडीच! धार्मिकतेबद्दल बोलायचं झाल तर पहिला 'व्रत' हा शब्द डोळ्यासमोर येतो. 'व्रत' हे नेहमी निष्ठेने करावे असे म्हणतात. आपल्या कुटुंबासाठी अश्या निष्ठेने केलेल्या व्रताचे फळ निश्चितच चांगले मिळते. ही निष्ठा स्त्रियांमध्ये प्रखरतेने असल्यामुळे आपल्या धर्मात स्त्रियांनी केलेल्या व्रतांना अधिक महत्व आहे. प्रत्येक व्रताची एक वेगळी खासियत असल्यामुळे बहुतांश स्त्रिया सर्व व्रते मनापासून करतात. थोडक्यात काय तर 'व्रत' म्हणजे उपवास, भक्ती, आराधना किंवा उपासना!

हल्ली बरेचसे भारतीय लोक वेगवेगळ्या देशांमध्ये नोकरीच्या निमित्ताने जात असतात. बरेचसे लोक तिथे स्थायिकही झाले आहेत. सण आणि उत्सव साजरे करण्याची संस्कृती ते त्या-त्या देशात टिकवून ठेवतात. अश्या सण, उत्सव, परंपरा आणि माणसांमधील नाती टिकवण्याचे काम प्रामुख्याने करणारी संस्था म्हणजे **'महाराष्ट्र मंडळ'**. अमेरिकेत कॅलिफोर्निया, न्यू जर्सी, सिॲटल् या शहरांमध्ये सण व उत्सव जोषात साजरे केले जातात. हे मी स्वतः अनुभवले आहे. माझे जावई आणि मुलगी शीतल पटवर्धन-बापट हे गेली 12 वर्षे सिॲटल् मध्ये स्थायिक आहेत. तिच्याकडे येण्याचा योग आला आणि वेगळा देश, वेगळी संस्कृती पाहायला मिळणार ह्याचा आनंदही झाला. इतकी वर्ष मी शीतलकडून फक्त सिॲटल् महाराष्ट्र मंडळाबद्दल ऐकून होते. परंतु तिथे प्रत्यक्ष गेल्यावर मला त्यांच्या कामाचे स्वरूप कळले. तेथील



सभासदांचा उत्साह बघून मी अक्षरशः भारावले. भारतात जसे सण व उत्सव साजरे होतात तितक्याच दणक्यात मंडळातील लोक सणांचे स्वागत करतात. गुणी व विचारवंत साहित्यिकांना प्रोत्साहन म्हणून राबविली जाणारी 'सारथी' अंकाची कल्पना तर मला खूपच आवडली. उत्तम लेख, कविता, सुंदर-सुंदर चित्रे ह्यांनी नटलेला हा सारथी अंक. अश्या सतत कार्यरत असणाऱ्या आणि इतरांना प्रोत्साहन देणाऱ्या, माणसे जोडणाऱ्या अमेरिकेतील सर्व महाराष्ट्र मंडळांचे विशेषतः सिॲटल् महाराष्ट्र मंडळाचे माझ्याकडून हे एक लेखरूपी कौतुक!

आपल्या साडेतीन मुहूर्तापैकी मानला जाणारा शुभमुहूर्त म्हणजे ' गुढीपाडवा'. हा पाडवा चैत्र महिन्यात येतो. याच शुभमुहूर्तापासून सर्व सण सुरु होतात. हल्ली 'मिनी गुढी' चे खूप प्रस्थ आहे. पण सिॲटल् मध्ये घरोघरी उभारल्यालेल्या गुढ्या पाहून मी आनंदले. वैशाख महिन्यातील 'अक्षय तृतीया' असो वा ज्येष्ठ महिन्यातील 'वटपौर्णिमा' सर्व सण सिॲटल्

मध्ये enjoy करतात. भारतात वडाच्या झाडाची पूजा केली जाते परंतु वडाच्या झाडाचे चित्र इंटरनेट वर बघून पूजा करणाऱ्या स्त्रिया मी अमेरिकेत पाहिल्या. तुम्हाला ऐकायला कदाचित वेगळं वाटेल पण शेवटी भावना महत्वाच्या. आषाढ म्हंटला कि 'गुरुपौर्णिमा' आणि 'आषाढी एकादशी' आली. गुरूला वंदन करून गुरुस्तवन, उडती मराठी गाणी गाऊन हा बहुरंगी कार्यक्रम मला एका महाराष्ट्र मंडळात पाहायला मिळाला. विठ्ठलाची वारी जरी शक्य नसली तरी 'दिंडी' आणि तिथल्या indian store मध्ये मिळणारे 'वरीचे तांदूळ' बघून मी सुखावले. छान उपवास धरून घरच्या घरी विठ्ठलाची भक्ती केली. कोण म्हणतं देव फक्त देवळात असतो?

श्रावण मास म्हंटला की सणांची मेजवानीच असते. पूर्वीच्या काळी स्त्रियांना फारसे बाहेर पडता येत नसल्यामुळे सणांच्या निमित्ताने सर्वजण एकत्र येऊन भोजनाचा आस्वाद घेत असत. हीच संस्कृती थोडी modern झाली आणि 'मंगळागौर', 'नागपंचमी', 'नारळीपौर्णिमा' या पारंपारिक सणांची विविधता आणि कलात्मकता जोपासण्याचा प्रयत्न अमेरिकेत प्रकर्षाने जाणवला. भाद्रपद महिन्यात सर्वजण गणपतीबाप्पाची आतुरतेने वाट बघतात. सिॲटल् मध्ये बाप्पाची मिरवणूक लेझीम आणि ढोलताश्याच्या तालावर खूप सुरेख बघायला मिळाली. लहान मुलांच्या शिबिरातून गमतीदार आणि वैविध्यपूर्ण गोष्टी शिकविल्या गेल्या. लहान मुलांचे कार्यक्रम, बाप्पाची आरती आणि सुंदर सजावट ह्या गोष्टींनी 'सिॲटल् चा बाप्पा' अधिकच लोभस वाटला. विसर्जन हा प्रकार इथे शक्य नसल्यामुळे प्रदुषणमुक्त सण पाहायला मिळाला. लहान मुलांपासून ते तरुण मुलांपर्यंत सर्वांसाठीच असणारी नाटके, जादूचे प्रयोग हे programs बघायला मिळाले. आश्विन महिन्यातल्या 'नवरात्रीला' खेळला जाणारा दांडिया मस्त होता. 'दसऱ्याला' केल्या जाणाऱ्या श्रीखंडाची गोडी यावेळी काही औरच होती. त्यानंतर २० च दिवसात 'दिवाळी' आली. रांगोळ्या, फुले, लाईटच्या माळा, यांचा झगमगाट वेगळाच होता. 'लक्ष्मीपूजन', 'पाडवा', 'भाऊबीज' या दिवशी सर्व एकत्र जमून आनंद लुटतात. 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम भारतातच नाही तर अमेरिकेतही होतो. ह्या कार्यक्रमांमधील स्वयंशिस्त व स्वच्छता मनाला भावली. मी आणि माझ्यासारखे अनेक पालक दरवर्षी फराळाचे पदार्थ कुरीयरने पाठवतात. साता समुद्रापार आपल्या मुलांना मायेचे, प्रेमाचे पदार्थ मिळाले ह्यातच समाधान वाटते. कार्तिक महिन्यातील 'तुळशी विवाह', एकादशी', मार्गशीर्षातील देवी देवतांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी होताना दिसली. अमेरिकेतला 'ख्रिसमस' म्हणजे मुख्य सण. भारतीय लोकही तो आनंदाने साजरा करतात. पौष व माघ मधली 'मकर संक्रांत' आणि 'वसंतपंचमी' मी पाहिली. 'तिळगुळ घ्या गोड बोला' असे म्हणत सिॲटल् महाराष्ट्र मंडळात खाद्यपदार्थांची जत्राच होती. फाल्गुन मधल्या 'होळीत' नवीन कलाकारांना मंडळ प्रोत्साहन देते. मला ती 'अनुभवाची शिदोरी' इतकी आवडली की तिथल्या कार्यकारी मंडळाला मी 'भविष्यातही असे चालू ठेवा' असे सांगितले.

'देश तसा वेष' ही म्हण मला अगदी पुरेपूर पटली. बारा महिन्यांचे बारा सण आणि त्यांचे महत्व आपल्या पुढच्या पिढीला माहित करून देणे पालकांचे कर्तव्यच आहे असे मला वाटते. आज सण, उत्सव आहेत म्हणून आपली संस्कृती टिकून आहे. सणांचे इतके वेगळे दर्शन घडवून दिल्याबद्दल मी सिॲटल् महाराष्ट्र मंडळाचे आभार मानून सुखी अंतःकरणाने भारतात परतले. सिॲटल् महाराष्ट्र मंडळाला माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा!

सण, उत्सव करू, आपण राहू सगळे आनंदात ।
संस्कृती, परंपरा टिकवू, फक्त भारतात, Seattle मध्ये नव्हे तर जगभरात ॥

**- श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन**

# BMM २०२२ - सिॲटल् करांची गौरवगाथा

नमस्कार मंडळी,

या वर्षी सिॲटल् करांनी BMM अधिवेशन दणाणून सोडलं. **Seattle rocked BMM!**

नुकतंच म्हणजे ११ ऑगस्ट २०२२ ते १४ ऑगस्ट २०२२ ह्या चार दिवसात बृहन महाराष्ट्र मंडळाचे २० वे अधिवेशन अटलांटिक सिटी, न्यू जर्सी येथे पार पडले. मराठी अस्तित्वाचा आगळा-वेगळा मराठी संस्कृती जपणारा, त्या बरोबरच नव्या विचारांची ओळख करून देणारा हा सोहळा भव्य स्वरूपात, अत्यंत दिमाखात अनेक नावाजलेल्या (सेलिब्रिटीज) आणि स्थानिक कलाकारांच्या उपस्थितीत साजरा झाला. अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, मेळावे, नादरंग, नाट्यरंग अशा स्पर्धा, ढोल-ताशा पथकांचा जल्लोष अशा अनेक गोष्टींनी आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रमांनी हे अधिवेशन नटलेलं होतं.

सिॲटल् मधील अनेक गुणी कलाकारांचा ह्यात विशेष सहभाग होता. आणि नुसता सहभागच नाही तर तिथे झालेल्या स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवून सिॲटल् चं नाव उज्वल केलं. त्यांच्या यशाचा आढावा घेण्यासाठी आणि भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने त्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी हा लेखनप्रपंच.

- सर्वप्रथम अभिनंदन करू या SMM २०२२ च्या कार्यकारी समितीची अध्यक्ष **सौ. सविता मोरे** ह्यांचं.



त्या निवडणूक अतिशय अटीतटीची होती पण सवितानी त्यात बाजी मारली. समितीवर आपल्या कारकीर्दीत BMM मधील कार्यक्रमांमध्ये सिॲटल् करांचा जास्तीत जास्त सहभाग आणि २०२६ चं BMM अधिवेशनाचं यजमानपद सिॲटल् ला मिळणं ह्या दोन गोष्टींवर त्यांचा प्रामुख्याने भर असेल. सविता मोरे ह्यांना पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा!

- BMM अधिवेशनासाठी लक्षवेधक SMM स्टँडी design केली होती कार्यकारी समितीवरील वेबमास्टर **अश्विनी क्षीरसागर** हिने.





- **माणिकमोती**: माणिक वर्मा ह्यांच्या आयुष्यातील काही पैलूंची झलक आणि गाण्यावर आधारीत कार्यक्रम. प्रेक्षागृह तुडुंब भरलेले आणि जवळपास ५०० पेक्षा जास्त लोक ह्या मैफिलीचा आनंद घेत होते. लोकांना कार्यक्रम इतका आवडला की टाळ्यांच्या गजरात प्रेक्षागृह दणाणून सोडलं. हा कार्यक्रम म्हणजे माणिक ताईंच्या काळात घेऊन जाणारा एक सुखद सांगीतिक प्रवास होता. रसिकांचा उदंड प्रतिसाद ही कार्यक्रमाला मिळालेली यशाची पावती ठरली.

  **मूळ संकल्पनाः शीतल पटवर्धन-बापट**, गायन: पल्लवी एकबोटे आणि शीतल पटवर्धन-बापट,

  

  वादन साथ: दीपश्री जोगळेकर((संवादिनी), जयंत भोपटकर आणि आशुतोष गलांडे (तबला),
  निवेदन: स्नेहल पिटके-कुलकर्णी,
  विशेष आकर्षण: बालगोपालांकडून दिलेली स्वतंत्र स्वरांजली.
  बालगायक: शरंण्या शिळमकर, सानवी कदम, काश्यपी देशपांडे, रेवा गलांडे, गार्गी मोघे, ओजस कुलकर्णी.

- **अनुभूती**: त्याच दिवशी झालेला दुसरा कार्यक्रम म्हणजे आरती लोटलीकर हिच्या "पंचम सूर" प्रस्तुत 'अनुभूती' कृष्ण धवल गाण्यांची सुरेल स्मृती हा जोशपूर्ण कार्यक्रम. कार्येक्रमाला अतिशय सुंदर प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या नावाप्रमाणेच एका सुरेल स्वर्गीय मैफिलीची अनुभूती प्रेक्षकांना आली. Standing ovation मिळाले. असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा व्हावेत ही इच्छा सर्वांनी प्रगट केली. तुमचाकार्यक्रम मुख्य हॉल मध्ये असायला पाहिजे अशी पण प्रतिक्रिया आली. This is one of the best BMM programs... ही प्रतिक्रिया खूप काही देऊन गेली.

  **मूळ संकल्पनाः आरती लोटलीकर**, गायक: प्रसन्न गणपुले, विभूती कवीश्वर आणि आरती लोटलीकर

  

  सत्यजित प्रभूं समवेत

  वादन साथ: दीपश्री जोगळेकर, जयंत भोपटकर, श्रीराम नंजुंडैय्या आणि आशुतोष गलांडे.
  प्रख्यात संवादिनी वादक: सत्यजीत प्रभू
  निवेदन आणि चित्रफीत निर्मिती: स्नेहल पिटके-कुलकर्णी, तंत्रसहाय्य: संदेश मोघे
  सर्व कलाकारांचे अभिनंदन!!! पुढील वाटचालीस त्यांना खूप खूप शुभेच्छा!!!

- **स्वयम् प्रकाशी स्वरतारे -** गेल्या दोन दशकातील उभरत्या मराठी संगीतकारांच्या गीतांवर आधारित, नृत्य गायनाचा कार्यक्रम " स्वयं प्रकाशी स्वर तारे" सिॲटल्, ॲरिझोना व न्यूजर्सीच्या कलाकारांनी दि.13 ऑगस्ट रोजी सादर केला. रसिक प्रेक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.या कार्यक्रमात सिॲटल् मधील **संकेत जोशी** ह्यांचा सहभाग होता. त्यांचे खूप अभिनंदन!!!

  

- **BMM 2022 च्या नादरंग ढोल ताशा स्पर्धेचे उपविजेते** आणि विज्ञान दिंडी मिरवणूक प्रमुख सहभाग:
  **Shiva Rhythms of India**
  त्यांनी ह्या स्पर्धेसाठी कसून तयारी केली होती. छोटे पथक आणि स्पर्धेत परफॉर्म करायचा पहिलाच प्रयत्न पण ढोल ताशा वाजवण्याची passion आणि उत्साह, कमी दिवसात केलेली जीव ओतून मेहनत, उत्कृष्ट नेतृत्व आणि स्पर्धा जिंकायचीच हा दृढ निर्धार ह्या बळावर त्यांनी स्पर्धेत उपविजेतेपद मिळवलं आणि सिॲटल् चा डंका न्यू जर्सीत वाजवला. तब्बल २४ स्पर्धक पथकांची ऑडिशन झाली; त्यात अंतिम फेरीमध्ये फक्त ६ पथके निवडली गेली. त्यातही अंतिम फेरीमध्ये आलेली पथके एकास एक तोडीची आणि जबरदस्त टक्कर देणारी होती. स्पर्धा अतिशय चुरशीची झाली. परीक्षकांना निकाल सांगण्यासाठी खूप बारकावे बघावे लागले. त्यासाठी त्यांनी बराच वेळ घेतला. अशा स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळवणं ही खूप कौतुकास्पद आणि अभिमानाची गोष्ट आहे. शिवा पथकाचं जोरदार अभिनंदन!!!






**संकल्पना आणि नेतृत्व:** विनय क्षीरसागर (ढोल), पराग राजोपाध्ये (ताशा)
**वादक:** ताशा: निखिल देवस्थळी, ढोल: विराज देशपांडे, अर्चना साठ्ये, अद्वैत साठे, समीर परगांवकर, तृप्ती राऊत, संजय राऊत, अमित केळकर,
**ध्वज:** रमा केळकर
तुमच्या पुढील वाटचालीस तुम्हाला अनंत शुभेच्छा!!

**BMM २०२२ नृत्यरंग स्पर्धा** - **प्रथम क्रमांकाचे पारितोषिक:**
ह्या स्पर्धेसाठी Strings N Beats from Seattle प्रस्तुत **थुंगा थुंगा** (मूळ नृत्य: पंडीत बिरजू महाराज) हा कथ्थक नृत्याचा बहारदार कार्यक्रम झाला. ह्या नृत्यास **प्रथम क्रमांकाचे पारितोषिक** मिळाले.
नृत्य सादरीकरण: ईशा तरटे आणि तृप्ती राऊत
नृत्य दिग्दर्शन: ईशा तरटे
ईशा तरटे आणि तृप्ती राऊत दोघींनाही त्यांच्या यशाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस त्यांना खूप खूप शुभेच्छा !!!



- **BMM २०२२ नाट्यरंग स्पर्धा – उत्कृष्ट अभिनेत्री पारितोषिक:** स्वप्नगंधा सिॲटल या संघाने "बदलतात गोष्टीही काळानुसार" ही एकांकीका BMM च्या नाट्यरंग स्पर्धेत उतरवली होती. स्पर्धेत एकूण ४२ एकांकीकांमधून १२ एकांकीका प्राथमिक फेरीत गेल्या. विजय केंकरे, कीरण यज्ञोपवित व अश्विनी भावे या



परिक्षकांनी १२ पैकी फक्त 3 एकांकीका अंतिम फेरीसाठी निवडल्या. त्यात 'स्वप्नगंधा' सिॲटलची विवेक गरुड लिखित आणि ईशा तरटे व संजय राऊत दिग्दर्शित एकांकीका "बदलतात गोष्टीही काळानुसार" होती. समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा विविध विषयांवर एका विशेष शैलीत भाष्य करणारी ही एकांकीका परिक्षक व प्रेक्षकांना भावली. या एकांकीकेस **सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक तृप्ती राऊत व रमा केळकर या दोघींना विभागून** देण्यात आले.
नाटकातील सहभागी कलाकार: तृप्ती राऊत, रमा केळकर, मानस राऊत व ओवी केळकर (BMM च्या कार्यक्रमामध्ये भाग घेतलेली सर्वात लहान कलाकार) नेपथ्य आणि प्रकाश: अमित केळकर, दिग्दर्शन: ईशा तरटे आणि संजय राऊत



BMM पारितोषिक आणि शिष्यवृत्ती २०२२ साठी **परीक्षक** मंडळामध्ये **श्रद्धा ओक** ह्यांची निवड झाली होती.

**मानाचा मुजरा:** बृहन्महाराष्ट्र मंडळ एक अभिनव सदर घेऊन आले – "मानाचा मुजरा"
आपल्या मराठी समाजामध्ये अशा बऱ्याच व्यक्ती आहेत ज्यांनी आपल्या व्यावसायिक आणि सामाजिक आयुष्यात उल्लेखनीय आणि भरीव कार्य केले आहे. हा मानाचा मुजरा दर महिन्यात BMM convention तर्फे उत्तर अमेरिका व कॅनडा मधील अशी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आपल्या लोकांना दिला गेला. या वर्षी सिॲटल् मधील मानाच्या मुजऱ्याचे मानकरी ठरले आहेत –
**विभूती कवीश्वर, अरुण निसरगंड, सुभग ओक, ललितागौरी आगाशे आणि जयंत भोपटकर**

या वर्षीचं अधिवेशन सिॲटल् करांनी त्यांच्या उत्कृष्ट सहभागाने आणि घवघवीत यशाने गाजवलं ह्यात वादच नाही. पुढील अधिवेशनात सिॲटल् च्या कलाकारांचे असेच सुंदर कार्यक्रम बघायला मिळोत, सर्व स्पर्धांमध्ये त्यांचा वाढता सहभाग असो आणि त्यात त्यांना यश मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**जय हिंद!!!**

**- अश्विनी क्षीरसागर**

# SMM च्या २०२२ मधील कार्यक्रमांची झलक

अश्रूंची झाली फुले- नाटक टीम समवेत



'पावनखिंड' मराठी चित्रपट screening





SMM उन्हाळी सहल





Interview of Dr. Anand Deshpande (Persistent)



मंगळागौर





गीत रामायण



Kids Camp



मकर संक्रांत



'अश्रूंची झाली फुले'


DIVERSIFY YOUR PORTFOLIO!
SAVE FOR KIDS' COLLEGE!
BE JOB OPTIONAL!
RETIRE YOUNG, RETIRE RICH!
WITH A REAL ESTATE PORTFOLIO
#1 PORTFOLIO PLANNING
#2 FUNDING STRATEGY
#3 PROPERTY ACQUISITION
#4 PROPERTY MANAGEMENT
FOR RENT
#5 PORTFOLIO REVIEW
SALE
1031
BRICKSFOLIOS
REAL ESTATE SOLUTIONS
Powered By inbestments
Build Wealth with Your Home
BRICKSFOLIOS' UNIQUE END-TO-END WHITE-GLOVE SERVICE AND TECH REMOVES THE HASSLE AND THE GUESSWORK FROM BUILDING LASTING WEALTH
SMM members save $500 with Complimentary Real Estate Portfolio Planning.
POONAM GAJBE
REAL ESTATE WEALTH ADVISOR
(816) 616-8226
Poonam@BricksFolios.com
www.BricksFolios.com
Receive Smart Insights to #BuildWealth with your home
https://inbest.us/poonam



**ध्यास संस्कृती जपण्याचा...**
**गणरायाच्या भक्तीसाठी आणि**
**महाराष्ट्राच्या शक्तीसाठी सदैव तत्पर !!!**

BEATS OF REDMOND
EST 2019
DHOL TASHA PATHAK

We are Beats Of Redmond Dhol Tasha Pathak, a non-profit charitable organization (501(c)(3) serving the Greater Seattle population. Our mission is to promote the Maharashtrian cultural ties,music and tradition within the community, to promote events and activities that help maintain the cultural heritage of Maharashtra, India. We also invest back in the community by hosting charity events like the Covid vaccination drive, food drive, blanket drive etc.

We are the first and the truly acclaimed Dhol Tasha Pathak in Washington USA since 2019 and the pioneers of Govinda Pathak across USA, the first one to bring Dahi Handi TO THE CONTINENT !!!

## Come Join Us

Register : **https://tinyurl.com/BeatsOfRedmond-EnrollmentForm**

: **BeatsOfRedmond.org**

:**@BeatsOfRedmond**

: **@BeatsOfRedmond**

: **BeatsOfRedmond@gmail.com**

: **425-241-3486**







